# प्रकरण तीन

## शिक्षण विभाग

### 3.44 जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील पाचवीच्या विदयार्थ्यांना दप्तर पुरविणे.

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1)** - शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांनी जिल्हा परिषद निधीमधून प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना प्रति नग 280 प्रमाणे एकूण रक्कम रुपये 99,99,920/- किमतींचे 35714 नग दप्तर पुरवठा केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद शिक्षण विभागाने पट नोंदणीनुसार दिनांक 30/09/2014 रोजी 31439 एवढी पट संख्या कळविलेली असतांना देखील 35714 नग खरेदी करण्यात आलेले आहेत. 4275 अतिरिक्त जादा नगांची खरेदी केल्यामुळे अतिरिक्त नगांची जादा रक्कम रुपये 11,97,000/- ची वसुली होणे आवश्यक आहे.

2) मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम 2006 कलम 66 नुसार करारनामा रुपये 8,900/- मुद्रांक शुल्क भरून करणे आवश्यक होते. तथापि, ते रुपये 100/- किमतीच्या मुद्रांक पेपरवर करण्यात आल्याने शासनाचे रुपये 7,900/- चे मुद्रांक शुल्काचे नुकसान झालेले आहे. रक्कम रुपये 7,900/- ची वसुली होणे आवश्यक आहे.

### 3.45 जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता 5 वी ते 7 वी च्या विदयार्थ्यांना इको फ्रेंडली पोलीमार डयुल डेस्क व्यवस्था पुरविणे खरेदीतील अनियमितता.

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4)** - जिल्हा परिषद, ठाणे शिक्षण विभागाने सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता 5 वी ते 7 वी च्या विदयार्थ्यांना इको फ्रेंडली पोलीमार डयुल डेस्क व्यवस्था पुरविण्यासाठी एकूण रुपये 3,99,99,861/- एवढया किमतीचे डयुल डेस्क मे. राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ मर्यादित, मुंबई, मे वैदयनाथ सव्हिसेस, औरंगाबाद आणि मे. अथर्व ट्रेडिंग कंपनी, औरंगाबाद यांच्याकडून खरेदी केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2013-2014 साली शिक्षण विभागाकडे डयुल डेस्कचा शिल्लक साठा 62076 नग होता. सन 2014-2015 च्या 5वी ते 7वी च्या पट संख्येनुसार आवश्यक नग 46277 एवढे होते. शिल्लक साठा हा आवश्यकतेपेक्षा जास्त असून देखील सन 2014-2015 मध्ये अनावश्यक 8715 डयुल डेस्क नग खरेदी करण्यात आलेले आहेत.

2) योजनेच्या उद्देशानुसार 5 वी ते 7 वी च्या विदयार्थ्यांकरिता डयुल डेस्क खरेदी करावयाचे असतांना देखील इयत्ता 4थी च्या विदयार्थ्यांसाठी B टाईपचे एकूण रुपये 97,76,178/- एवढया किमतीचे एकूण 2326 नग मे. राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ मर्यादित, मुंबई यांच्याकडून खरेदी करण्यात आलेले आहेत. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झालेला नाही.

3) पुरवठादाराने पुरवठा केलेल्या डिलिव्हरी चलनावर पुरवठयाचा दिनांक नमूद केलेला नाही.

4) डयुएल डेस्क स्वीकारणाऱ्या व्यक्तीनेही डयुल डेस्क कोणत्या दिनांकास प्राप्त झाले याची तारीख नमूद केलेली नाही. तसेच प्राप्त झालेल्या डयुल डेस्कची नोंद जडसंग्रह नोंदवहीत कोणत्या पृष्ठावर घेण्यात आली याचा तपशील नमूद नाही.

5) गट शिक्षणाधिकारी यांचा दाखला दिनांक 22/09/2014 वर पंचायत समितीचा जावक क्रमांक नमूद करण्यात आलेला नाही. तसेच काही ठिकाणी गट शिक्षणाधिकारी यांनी पुरवठा सन 2013-2014 च्या पुरवठा आदेशानुसार झालेला आहे असे नमूद केलेले आहे. सबब पुरवठा सन 2014-2015 च्या आदेशानुसारच झालेला आहे याची लेखापरीक्षणास खात्री करता आलेली नाही.

6) डयुएल डेस्कचा पुरवठा काही प्रकरणी प्रत्यक्ष शाळेवर करण्यात आलेला नाही.

7) डयुएल डेस्क खरेदीची प्रमाणके लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाहीत.

**3.46 जिल्हा परिषद निधीमधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्‌यार्थ्यांना शूज पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7)** - जिल्हा परिषद, शिक्षण विभागाने दुर्गम भागातील आदिवासी गरजू विद्‌यार्थ्यांना पावसाळ्यात वापरण्यासाठी एकूण रुपये 99,99,884/- एवढया किमतींचे शूज खरेदी केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विदयार्थ्यांना आवश्यक असलेल्या शूजच्या साईजची विद्‌यार्थीनिहाय मागणीपत्र नस्तीस उपलब्ध नाही. त्यामुळे पुरवठा आदेश कशाच्या आधारे देण्यात आले हे स्पष्ट होत नाही.

2) पंचायत समिती, मोखाडा यांनी 2350 नग मागणी केलेली असताना त्यांना 2410 नग पुरविण्यात आलेले आहेत.

3) पंचायत समिती, वाडा यांना आवश्यकता नसतांना देखील 426 अतिरिक्त नग पुरविण्यात आलेले आहेत.

4) पंचायत समिती, शहापूर, भिवंडी, मुरबाड आणि कल्याण यांनी सन 2013-2014 मध्ये वाटप केलेल्या शूजची आकडेवारी दिलेली नाही. सबब दुबार पुरवठा झालेला असल्याबाबत खात्री करता आलेली नाही.

5) पंचायत समिती, अंबरनाथ यांची प्रत्यक्ष शूजची मागणी 2175 नग असतांना त्यांना 2870 शूज नग पुरवठा करण्यात आलेला आहे. सबब 695 शूज नग अतिरिक्त पुरवठा करण्यात आलेला आहे.

6) पुरवठादाराकडून पुरवठा रकमेच्या 5 टक्के म्हणजेच रुपये 4,99,942/- इतकी बँक हमीपत्र घेणे आवश्यक असतांना ती रुपये 4,96,000/- इतक्या रकमेची घेण्यात आलेली आहे. रक्कम रुपये 3,942/- इतकी बँक हमी कमी घेण्यात आलेली आहे.

**3.47 शाळांना फॉर्मस व रजिष्टर पुरविणे बाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर योजनेवर जिल्हा परिषद सेस मधून प्रमाणक क्र.178 दिनांक 17/07/2014 रक्कम रूपये 9,99,380/- व प्रमाणक क्र.795 दिनांक 31/03/2015 रक्कम रूपये 5,88,955/- एकूण एकंदरीत 15,88,335/- खर्च केलेला आहे.

1) शिक्षण विभागाने शाळांना फॉर्मस व रजिष्टर पुरविण्याबाबत व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को.ऑफ कन्झुमर्स फेडरेशन लिमीटेड मुंबई यांना पुरवठा आदेश दिलेले आहे. तथापि पुरवठा आदेश देणेपुर्वी शासन दर सुची उपलब्ध केलेली नाही. त्यामूळे सदरचे दर शासन मान्य दर सुची प्रमाणे असलेबाबत लेखापरिक्षणात पडताळणी करता आली नाही.

2) पुरवठादाराने अलिबाग व मुरूड गटास 4 आठवडे, पेण गटास 7 आठवडे व उर्वरीत 12 गटांना माल किती तारखेला प्राप्त झाला याबाबतचे चलनावर दिनांक नमुद नाही. मालाचा पुरवठा, पुरवठा दाराने विलंबाने केल्याबाबत अर्धाटक्का दंडाची रक्कम परिगणीत करून वसूल करण्यात यावी.

3) तात्रीक मंजूरी, प्रशासकीय मंजूरी तसेच पुरवठा आदेश या सर्व प्रक्रिया एकाच दिवसात केल्याचे दिसून येते.

4) उपरोक्त देयक अ.क्र.1 मधून शासकिय कपातीच्या रक्कमा खालील प्रमाणे वसूल केलेल्या नाहीत.

5) 5 टक्के विक्रिकर रक्कम रूपये 49,969/- 2 टक्के आयकर रककम रूपये 19,988/-, आयकर रकमेच्या 15.1 टक्के आयकर सरचार्ज रक्कम रूपये 2,998/- एकूण 72,955/-

6) पनवेल, उरण, कर्जत, पोलादपूर, व मुरूड या गटांनी त्यांचे अंतर्गत शाळांना माल प्राप्त झाल्याबाबतची पोच सादर केलेल्या नाहीत.

**3.48 शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षा सहित्य पुरविणे. (इयत्ता 3 री व 6 वी)**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** जिल्हा परिषद निधीमधून प्रमाणक क्र.794 दिनांक 31/03/2015 रक्कम रूपये 8,19,792/- प्राथमिक शाळेमधील प्रज्ञाशोध परीक्षा इयत्ता 3 री व 6 वी ची घेणेकरीता प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व लखोटे पुरविणेकामी महाराष्ट्र स्टेट कॉपरेटीव्ह कन्झुमर्स लिमिटेड करीता देयक अदा केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गट- उरण, महाड, खालापूर, म्हसळा, मुरूड व पोलादपूर या गटांना प्रज्ञाशोध परिक्षेनंतर अतिविलंबाने साहित्य पुरवठा केलेला असून साहित्य प्राप्त होणेपुर्वी देयक अदा केलेले आहेत.

2) देयक अदा करणेपर्वी चलन क्रमांक दिनांक साहित्य संख्या व प्राप्त साहित्य दिनांक याबाबतचा ताळमेळ घेतलेला नाही.

3) साहित्य प्राप्त झाल्याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्र दिलेली नाही.

4) पुरवठा आदेशासोबत तालुकानिहाय साहित्याचे तपशिलवार यादी नसतांनी पुरवठादारांनी साहित्य कशाच्या आधारे वाटप केले याबाबत खुलासा होत नाही.

5) उपरोक्त अ.क्र.1मध्ये दर्शविल्याप्रमाणे विलंबाने साहित्य पुरवठा केलेला असल्याने अटी व शर्ती व दंडाची रक्कम रूपये 57,385/- पुरवठादाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

6) तालुका स्तरावरून प्रज्ञाशोध परिक्षेच्या विदयार्थी संख्या मागविण्यात आलेली नाही.

7) प्रज्ञाशोध परिक्षेचे साहित्य दिनांक 20/05/2015 नंतर पुरवठा झालेले गट उरण, खालापूर, महाड, म्हसळा, मुरूड व पोलादपूर या गटातील विदयार्थ्यांची परीक्षा घेतली केलेला खर्च ज्या प्रयोजनासाठी केला आहे. त्याचा विनियोग त्याच कारणासाठी केला किंवा कसे? याची लेखापरिक्षणात खातरजमा करता येत नाही.

### 3.49 प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांसाठी दृकश्राव्य प्रणाली राबविणे योजनेतील अनियमितता.

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** जिल्हा परिषद सेस या योजनेअंतर्गत रायगड जिल्हयातील 41 शाळांना दृकश्राव्य प्रणाली साहित्याचा पुरवठा केलेला आहे. व त्यासाठी रूपये 21,50,000/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अटी व शर्तीनुसार ज्या शाळांना एल.सी.डी., डि.व्ही.डी. यापुर्वी पुरविलेले नाही, व ज्या शाळेत लाईटची सोय आहे. अशा शाळांची नावे घेणे आवश्यक होते परंतू अलिबाग, रोहा, व पोलादपूर गट वगळता उर्वरीत 12 गटातील 32 शाळांनी मागणी नोंदविली नसतांना दृकश्राव्य प्रणालीचा पुरवठा केलेला आहे.

2) दृकश्राव्य प्रणालीचा विलंबाने पुरवठा केलेला असतांना पुरवठा आदेश व पुरवठा दारासोबतचा दिनांक 06/09/2014 च्या करारनाम्यातील अटीशर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही करून रक्कम रूपये 7,892/- वसूल केलेली नाही.

3) साहित्य पुरवठा केलेल्या 41 शाळांची निवड करतांना कोणते निकश व आदेश वापरले याबाबतचे आणि सदर शाळांना दृकश्राव्य प्रणाली मंजूर केल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे मंजूरी आदेश लेखापरिक्षणात उपलब्ध झालेले नाहीत.

4) पुरवठा दाराने पुरविलेल्या साहित्याचे दर्जाची गुणवत्ता चाचणी तपासणी केलेली नाही.

5) सुधागड, अलिबाग, पेण, पनवेल, मुरूड या गटातील शाळांची उपयोगिता प्रमाणपत्र नाहीत.

### 3.50 प्राथमिक शाळागृह बांधकामे व दुरूस्तीसाठी केलेल्या खर्चाबाबत.

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** जिल्हा परिषद शिक्षण विभागाने प्राथमिक शाळागृह दुरूस्ती व बांधकामे यासाठी जिल्हा परिषद सेस मधून रक्कम रूपये 71,35,618/- एवढा खर्च केलेला आहे, यामध्ये खालील त्रृटी आढळल्या आहेत.

सदर बाबत गटविकास अधिकारी यांनी शाळागृह बांधकाम व दुरूस्तीसाठी केलेल्या मासिक खर्चाचा कामनिहाय प्रगती अहवाल व काम पुर्णत्वाचे दाखले, मुल्यांकने, उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केले नाहीत. उपरोक्त बाबींची पुर्तता होईपर्यंत सदर खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

### 3.51 इयत्ता 12 वी नंतर शिक्षणासाठी गरीब विदयार्थ्यांना विदया वेतन देणे.

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** जिल्हा परिषद, रायगड शिक्षण विभागाने जिल्हा परिषद सेस फंडातून गरीबा व दारिर्दय रेषेखालील विदयार्थ्यांना आर्थीक लाभ म्हणून प्रत्येक

विदयार्थ्यास रक्कम रूपये 5,000/- इतका लाभ जिल्हयातील 140 विदयार्थ्यांना देण्यात आला आहे. यावर जिल्हा परिषद सेस मधून रूपये 7,00,000/- खर्च केलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) इयत्ता 12 वी उत्तीर्ण झाल्यावर उच्च शिक्षण घेत असले बाबत एकूण 60 विदयार्थ्यांचे दाखले नसतांना सदरचे विद्या वेतन दिले आहे.

2) लाभार्थ्यांची पोच नाही.

3) उपयोगिता प्रमाणपत्र नाही.

**3.52 डेस्क बेंच खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत शिक्षण विभाग यांनी सन 2014-2015 आर्थिक वर्षात इयत्ता 5 वी ते 7 वी च्या वर्गासाठी एकूण 1059 नग सागवानी बेंच खरेदी करण्यासाठी 4 टक्के सादिल मधून एकूण रक्कम रुपये 29,97,711/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गट स्तरावरून मागणी अर्ज नस्तीसोबत जोडण्यात आलेले नाहीत, त्यामुळे मागणी अर्ज नसतांना खरेदी कोणत्या आधारावर करण्यात आली याबाबत खात्री करता आली नाही.

2) 10 टक्के रक्कम संबंधित पुरवठादाराला किती तारखेला प्रदान करण्यात आली याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

3) नस्तीसोबत प्रोफार्मा इनव्हाईस बील जोडण्यात आलेले आहे. त्यामध्ये बेंच साईज नमूद केलेले नाही. टॅक्स इनव्हाईस बिल घेण्यात आलेले नाही.

**3.53 प्राथमिक शाळांची विशेष दुरुस्ती वरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** प्राथमिक शाळांची विशेष दुरुस्ती अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून रक्कम रुपये 2,30,64,000/- एवढी तरतुद करुन खर्च करण्यात आला. सदर कामाची कार्यनस्ती तपासली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत शाळा विशेष दुरुस्तीअंतर्गत सन 2014-15 या आर्थिक वर्षात रुपये 2,30,64,000/- एवढया अनुदानाची तरतुद करण्यात आली होती व त्यास प्रशासकिय मान्यतेने सर्व रक्कम बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आली. त्या अनुषंगाने पडताळणी केली असता वर्ग रक्कमेपैकी रक्कम रुपये 18,47,513/- एवढी खर्च होऊन रक्कम रुपये 2,12,16,487/- एवढी रक्कम शिल्लक आहे. यावरुन कामाची प्रगती असमाधानकारक असल्याचे दिसून येते. अनुदान 100 टक्के खर्च होणे अपेक्षित असताना कामाच्या प्रगतीबाबत शिक्षण विभागाने बांधकाम विभागाशी काहीच पत्रव्यवहार केल्याचे कार्यनस्ती तपासली असता दिसून येत नाही.

2) मंजुरी दिलेल्या कामाची उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच मुल्यांकन दाखले लेखापरीक्षणाचे वेळी आढळून आलेले नाही.

3) अनुदानाची नोंदवही तपासली असता त्यामध्ये नोंदी ठेवण्यात आलेल्या नाहीत. जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 67 मधील तरतुदीनुसार कामाच्या सदयस्थितीबाबत प्रगतीच्या नोंदी ठेवण्यात आलेल्या नाहीत.

**3.54 शालेय पोषण आहार या योजनेवरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** शिक्षण विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात शालेय पोषण आहार या योजनेसाठी दिनांक 31/03/2015 अखेर एकूण रक्कम रुपये 60,08,09,748/- (केंद्रहिस्सा रुपये 44,40,67,581/- व राज्य हिस्सा 15,67,42,167/-) खर्च केल्याचे आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचे, पत्र क्रमांक शापोआ.क्र.प्र/485/नापु,दिनांक 06/05/2003 नुसार तांदुळ वाटपाच्या हिशोब तपासणी केल्याचा अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.

2) मालाचा पुरवठा करण्यापुर्वी, जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक यांचेकडून वस्तुंचा दर्जा तपासणी अहवाल प्राप्त करुन नंतर पुरवठा करणे आवश्यक आहे. तपासणी अहवालात केवळ वस्तुंची नावे अनुक्रमांक 1 ते 10 अशी दर्शवून वस्तुंचा दर्जा चांगला, शेरा नमूद आहे तथापि चांगला दर्जा म्हणजे नेमका किती टक्के योग्य व किती टक्के अयोग्य त्याची प्रतवारी निकष घटकाचे प्रमाण याबाबत उल्लेख आढळून आला नाही.

3) तालुका स्तरावरील अधिक्षक यांनी मागणीपत्रक तपशिलासह दिलेले नाही मात्र शाळानिहाय मागणी, मंजूर केलेला पुरवठा, पुरवठादाराने प्रत्यक्षात केलेला पुरवठा, पुरवठा केलेल्या बॅग्ज / पोती / गोण्यांची स्थिती, याविषयी ज्यांनी साहित्य ताब्यात घेतले, त्यांचेकडून अहवाल घेऊन त्यानुषंगाने प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

4) गटशिक्षणाधिकारी व तहसीलदार यांच्या संयुक्त स्वाक्षरीने उपयोगिता प्रमाणपत्र शिक्षण विभाग जिल्हा परिषद नाशिक यांना सादर करण्यात आले बाबत खात्री करता आली नाही.

5) शालेय पोषण आहार योजना संदर्भातील, अपहार तक्रारीची प्रकरणे गट स्तरावरुन जिल्हा परिषद, शिक्षण विभागकडे सादर करणे आवश्यक असतांना ती नस्ती सोबत उपलब्ध झाली नाही.

6) शिक्षण समितीचे अहवाल नाही.

7) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत इंधन व मजुरी खर्च प्रमाण 75 टक्के व 25 टक्के प्रमाणे खर्चाची नोंदवही / अहवाल तपासणीस प्राप्त झाले नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांचे पत्र क्रमांक झेडपीए-2000/ प्र.क्र.4023,दिनांक 12/01/2001 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 4 परिशिष्ट-2 भाग-1 नुसार खर्चास प्रशासकीय मंजूरी आदेश संचीकेत आढळून आलेले नाही.

9) महाराष्ट्र शासन, शालेय क्रिडा व शिक्षण विभाग शासन, निर्णय क्रमांक शापोआ/2004/प्राशि-4,दिनांक 31/03/2005 च्या आदेशानुसार शाळांना अनुदान वितरीत करण्यासाठी दिलेल्या सुत्राप्रमाणे केलेले नाही. इयत्ता 1 ली ते 5 वी व इयत्ता 6 वी ते 8 वी राज्य शासन हिस्सा रक्कम रुपये 3,12,45,833/- व केंद्र शासन हिस्सा रक्कम रुपये 5,93,48,431/- असे एकूण 9,05,94,264/- अखर्चित असल्याचे दिसुन येते. यावरुन सक्षम प्राधिकाऱ्याचे योजनेवर नियंत्रण दिसुन येत नाही. तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार शालेय पोषण आहार व मानधन खर्च केल्याचे दिसुन येत नाही.

### 3.55 दंडाची रक्कम कपात न करता देयक मंजूर करणेबाबत.

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** प्रमाणक क्रमांक 180, दिनांक 20/03/2015 रक्कम रुपये 4,59,60,410/- महाराष्ट्र स्टेट कोऑपरेटीव्ह फेडरेशन, नाशिक यांना पोषण आहार रक्कम प्रदानाबाबतचे देयकातून पोषण आहाराचा पुरवठा विलंबाने केल्याने दंडात्मक कार्यवाहीची रक्कम रुपये 10,770/- कपात करुन निव्वळ रक्कम रुपये 4,59,49,639/- प्रदानाचे देयक मंजूर केलेले असतांना रोकडवहीत एकूण रक्कम रुपये 4,59,60,410/- ऐवजी रुपये 4,59,49,639/- प्रदान केल्याचा खर्च नोंदविलेला आहे. यावरून रुपये 10,770/- रोकडवहीत कमी खर्च नोंदविलेला आहे. देयकातून कपात केलेली दंडात्मक कार्यवाहीची रक्कम रुपये 10,770/- जिल्हानिधीत भरणा न केल्याने जिल्हापरिषदेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

### 3.56 शालेय पोषण आहार योजनेतील अनियमीततााबाबत.

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.383/ प्रा.शि.4, दिनांक 26/02/2010 अन्वये शालेय पोषण आहार

निवीदे अन्वये महाराष्ट्र स्टेट को ऑ मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई यांना धान्यादी मालाचा पुरवठा करण्याचा ठेका देण्यात आलेला असुन त्यावर रुपये 5,69,14,489/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.136/प्रा.शि.4,दिनांक 18/06/2009 अन्वये केद्र व राज्य शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा, खाजगी संस्थांच्या व अंशता अनुदानित शाळा, वस्तीशाळा महात्मा फुले हमी योजना केंद्रे याठिकाणी 1 ली ते 8 वी पर्यंतचे शिक्षण घेणारे विद्यार्थी शालेय पोषण आहार योजनेचे लाभार्थी आहेत. परंतू खाजगी संस्था अनुदानीत असल्याची सत्यता नस्ती उपलब्ध करुन दाखविणे आवश्यक आहे.

2) करारातील अ.क्रं. 3 अन्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पुरवठादारास केंद्रीय पुरवठा आदेश दिलेले नसतांना पुरवठा करण्यात आला आहे.

3) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील परिपत्रक दिनांक 26/02/2010 अन्वये ग्रामशिक्षण समितीने स्थानिक पातळीवर अन्न धान्य व आहाराचा दर्जा वेळोवेळी तपासणी करुन अहवाल दिलेला नाही.

### 3.57 शालेय पोषण आहार योजनेबाबत.

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** शालेय पोषण आहाराच्या खरेदी पोटी रक्कम रुपये 19,53,45,444/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/2009/ प्र.क.383/प्राशि-04, दिनांक 26/02/2010 अन्वये तीनही पावत्यांवर साहित्याचा वजनाचा व दर्जाचा तसेच साहीत्य सुस्थितीत प्राप्त झाल्याची पोहोच मुख्याध्यापक यांनी प्रमाणित केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/2009/ प्र.क.383/प्राशि-04,दिनांक 26/2/2010 अन्वये धान्यादी मालाची तपासणी अहवाल शासकीय प्रयोग शाळेकडे पाठवल्याचा अहवाल नस्ती सोबत प्रत्येक तालुका निहाय वेगळा अहवाल असणे आवश्यक असतांना एकाच तपासणी अहवालाची छायांकित प्रत काढून प्रत्येक तालुक्याच्या देयकाच्या सोबत जोडली आहे.

3) करारातील अटी / शर्ती नुसार मालाचा पुरवठा आदेश दिल्यापासुन 15 दिवसाच्या आत मालाचा पुरवठा न झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतचा पुरवठा आदेश नस्ती सोबत पहावयास मिळाला नाही. त्यामुळे माल मुदतीत प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

4) धान्यादी माल प्राप्त झालेबाबत संबंधित मुख्याध्यापकाची पोहोच आहे. तथापि पावतीवर करारातील अटी-शर्ती प्रमाणे वेळ नमुद नाही. तसेच बऱ्याच पावत्यांवर शाळेच्या माल साठा नोंदवहीचा पृष्ठक्रमांक नमुद नाही.

### 3.58 बालभवन केंद्रांना अनुदान वाटपाबाबत.

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** बालभवन केंद्रांना अनुदान वाटप योजनांतर्गत सन 2013-2014 व 2014-2015 या आर्थिक वर्षात एकुण रक्कम रुपये 3,90,000/- खर्च नोदविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण संचालक, पुणे (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांच्याकडुन जिल्हा बालभवन केंद्रनिहाय गावाच्या नावाचा समावेश करुन क्रमांक प्रशिक्षण/2014/जीभाब/सुआ/प्रशा-1/ड/504/7242/ 2723, दिनांक 17/05/2014 नुसार सुधारीत आदेश प्राप्त झाला असुन त्यात एकूण 45 गावांचा समावेश आहे. तथापि त्यात भादली बु ता.जळगांव या गावाचा समावेश नसतांना त्यांना एकूण रक्कम रुपये 10,000/- वाटप करणेत आलेली आहे.

2) शिक्षण संचालक पुणे (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांच्याकडील ज्ञापन क्रमांक प्रशिस/ 2014/15/योजनेत्तर/बाभ/प्रशा-1/ड/504, दिनांक 21/05/2015 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, जळगांव यांच्याकडील दिनांक 31/03/2015 च्या टिपणीनुसार बालभवन, केंद्र व्यवस्थापकांनी अनुदान रकमेचे हिशोब स्वतंत्र ठेवावयाचे आहेत. तसेच खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबधित संस्थने शिक्षण अधिकारी, प्राथमिक यांना सादर

करावयाचे आहे. तसेच, अनुदान प्राप्त झाल्यानंतर खर्चाचा अहवाल संबधित संस्थेने दोन महीन्याच्या आत शिक्षण अधिकारी, प्राथमिक यांचेकडे सादर करावयाचा आहे. त्यानुसार संस्थेने कार्यवाही केलेली नाही.

**3.59 शाळांसाठी साधन सामुग्री पुरविणे अंतर्गत लोक सहभागातुन संगणक घेणा-या जिल्हा परिषदांच्या शाळांना शैक्षणीक सॉफ्टवेअर पुरविणे योजनेतील इतर अनियमितता.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना ही लोकसहभागामधुन संगणक घेतलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी असतांना इतरही शाळांना योजने अंतर्गत लाभ देण्यात आला आहे.

2) लोक सहभागातुन संगणक घेणा-या जिल्हा परिषदेच्या किती शाळांसाठी शैक्षणिक सॉफ्टवेअरची आवश्यकता आहे, याचा अंदाज घेऊन त्यानुसार शैक्षणिक सॉफ्टवेअर खरेदीची कार्यवाही करणे अभिप्रेत असतांना केवळ अंदाजपत्रकीय तरतुद खर्च करण्याच्या दृष्टीने शैक्षणिक सॉफ्टवेअरची खरेदी करण्यात आली आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन पूरक पत्र क्रमांक झेडपीई-2001/प्र.क्र.132/पंरा-7(26), दिनांक 05/09/2002 नुसार साहित्य खरेदी करण्यापुर्वी शासनस्तरावर दरकरार अस्तित्वात आहे किंवा कसे ? याबाबत लेखी स्वरूपात खात्री करण्यात आलेली नाही.

4) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 29/10/2005 च्या शासन निर्णयानुसार माहिती तत्रज्ञान संचालनालयाची पूर्व परवानगी घेण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक 23/9/2013 च्या शासन निर्णयानुसार निवीदा कालावधी दिलेला असतांना निविदा कालावधी कमी करण्यात आलेला आहे.

6) ज्या शाळांना शैक्षणिक सॉफटवेअर पुरवठा करण्यात आला आहे. अशा शाळांच्या संगणकाचे स्पेसिफिकेशन प्रमाणे माहिती लेखी परीक्षणास सादर करण्यात आली नाही.

7) करारनाम्यातील अट क्रं.12 व आयकर अधिनीयम 1961 कलम 194 जे नुसार 10 टक्के दराने रूपये 6,89,600/- इतका आयकर कपात करणे आवश्यक असतांना रूपये 5,15,099/- इतका कमी आयकर कपात करण्यात आलेला आहे.

8) 452 शाळांचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही.

**3.60 कारागृहाकडून आरक्षित केलेल्या वस्तूंची खरेदी कारागृहाकडून न करता खाजगी पुरवठादाराकडून नियमबाहयरित्या खरेदी करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) (अ) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखसं-2002/2975/ उद्योग-6, दिनांक 07/03/2002 नुसार कारागृहाकडून आरक्षित केलेल्या पूर्वीच्या 65 वस्तूमध्ये आणखी नव्याने सोबतच्या "परिशिष्ट - अ" मधील 5 वस्तूंचा समावेश करण्यांत आलेला असून अनुक्रमांक 3 वर रेक्झीनदप्तराचा समावेश करण्यांत आलेला आहे. त्यानुसार जर या वस्तू कारागृहांमध्ये उत्पादित होत असतील तर या वस्तूंची खरेदी कारागृहाकडूनच करणे आवश्यक आहे.

(ब) त्यानुसार उपसचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक एम जे- 0121/8/ प्रक्र.130/पी आर एस-2,दिनांक 20/03/2002 नुसार "परिशिष्ट -अ" मधील 5 वस्तूंपैकी अनुक्रमांक 3 वरील वस्तू रेक्झीन दप्तराचे उत्पादन मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद येथे होत असल्याचे नमूद केले आहे.

(क) उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-2001प्र.क्र.83/पंरा-7(26), दिनांक 17/01/2003 नूसार 'परिशिष्ट-अ' मधील 5 वस्तूंपैकी आवश्यक असणाऱ्या वस्तूंची खरेदी अग्रक्रमाने कारागृह विभागाकडून करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनुक्रमांक (अ) ते (क) नूसार कारागृहाकडून आरक्षित केलेल्या वस्तुंचे उत्पादन कारागृहांमध्ये केले जात असतांना, अशा वस्तूंची खरेदी कारागृहाकडूनच करणे क्रमप्राप्त ठरत असतांना विभागाने मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद यांचेकडे रेक्झीन दप्तराची मगणी नोंदवून त्यानुसार साहीत्य खरेदी करणे क्रमप्राप्त होते. परंतू विभागाने तशी कोणतीही कार्यवाही न अवलंबिता खाजगी पुरवठादाराकडून रेक्झीन दप्तर खरेदी केले आहे. सबब शासन दिशा-निर्देशाचे उल्लंघन करुन रेक्झीन दप्तर खरेदी करण्यांत आल्याने केलेला खर्च रुपये 9,69,955/- मान्य करता येत नाही.

2) दप्तराच्या नमुन्याची तांत्रिक तपासणी केली असता औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहमदनगर यांचे पत्र क्रमांक औप्रसंअ-पी.ओ.टी.एस/2014-15/2180, दिनांक 14/08/2014 नुसार दिलेल्या तांत्रिक तपासणी अहवालानुसार 5 पुरवठादारांपैकी 2 पुरवठादारांचे (वर्षा ट्रेडिंग कंपनी व निर्मल एजन्सी) साहित्य मानकाप्रमाणे नसतांना देखिल त्यांना पुरवठा आदेश देण्यांत आला. त्यामुळे मानकाप्रमाणे योग्य दर्जा व गुणवत्तेचे साहित्य पुरवठा करण्यांत आलेले नाही.

3) खरेदी करण्यांत आलेल्या एकूण 5,243/- नग रेक्झीन दप्तराचा विनियोग केल्याबाबत साठा नोंदवही लेखा परीक्षणास सादर करण्यांत आली नाही.

**3.61 वस्ती शाळा निमशिक्षकांची कायम पदावर नेमणूक करून नियमित केले बाबतच्या अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** शिक्षण विभागाकडील प्राथमिक शिक्षकांची पदे अतिरिक्त असताना वस्ती शाळा निमशिक्षकांची कायम पदावर नेमणूक करुन नियमित केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण विभागाने 295 वस्ती शाळा निमशिक्षकांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून दिनांक 01/03/2014 पासून वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेडवेतन 2800 मध्ये सामावून घेवून प्रवर्गनिहाय 7 तालुक्यांमध्ये नेमणूका करण्यात आल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीबीसी1097/प्र.क्र.63/97/16-ब, दिनांक 18/10/1997 व सरळसेवा भरतीसाठी शासन निर्णय क्रमांक बीबीसी1097/प्र.क्र.2/16-ब,दिनांक 29/3/1997 अन्वये स्वतंत्र 100 बिंदुनामावली निश्चित केली आहे. बिंदुनामावली नोंदवहया नवीन भरती अथवा पदोन्नती नंतर बिंदुनामावलीचा अनुशेष तपासुन बिंदुनामावली नोंदवही अदयावत ठेवणे आवश्यक आहे**.** बिंदुनामावली नोंदवही अदयावत ठेवण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिकाऱ्याची आहे. बिंदुनामावली नोंदवही न ठेवता नियुक्त्या व पदोन्नती देणे हे शासनाचे आरक्षण विषयक धोरणांशी विसंगत आहे**.**

2) बिंदुनामावली नोंदवही अदयाप मागासवर्गीय संवर्गाकडून मंजुर नसलेने सदरचे 295 वस्ती शाळा निमशिक्षकांना नियमबाहयरित्या नेमणूक आदेश दिलेले आहे**.** कोणत्या प्रवर्गातील नेमके किती बिंदू रिक्त आहेत**.** हे स्पष्ट होवू शकत नाही**.**

3) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक एसएसए-2012/प्र.क्र.250/प्रशि-4,दिनांक 01/03/2014 चे परिच्छेद 6 अन्वये वस्तीशाळा निमशिक्षकांना जिल्हा परिषदेच्या शांळामध्ये रिक्त पदावर कायमस्वरुपी वेतन श्रेणीवर सामावून घेऊन त्याचे समायोजन करावयाचे आहे. तथापी त्याअनुषंगाने 30/09/2013 रोजीचे पटसंख्येनुसार शिक्षक निश्चितीबाबत शिक्षण उपसंचालक यांनी मंजुर केलेल्या शिक्षकांचे पदांची नस्ती मागणी करुनही उपलब्ध न झालेने उपशिक्षक/प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे किती आहेत याची माहीती उपलब्ध झाली नाही. तथापि समायोजनाची नस्ती तपासता त्यामध्ये मंजुर पदे रिक्त पदे व समायोजित पदे यांचा कोणताही ताळमेळ घेण्यात आलेला नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असुन पदे रिक्त नसताना केलेल्या समायोजनामुळे शासन निधी रक्कम रुपये 7,50,34,010/- ची हानी झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही**.**

4) महाराष्ट्र शासन, परिपत्रक सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय विभाग क्रमांक 570/मावक-5, दिनांक 05/03/2005 अन्वये व नेमणूक आदेशातील अट क्रमांक 13 नुसार जाती वैधता प्रमाणपत्र नेमणूकीचे आदेशापासुन 6 महिन्यात सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात यावी असे

नमूद आहे. तथापी अदयाप 54 शिक्षकांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेच्या नोंदी व प्रमाणपत्रे, अहवाल आदी लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. वैधता प्रमाणपत्राशिवाय नेमणुका 6 महिन्या नंतर रदद केलेचे दिसून येत नाही.

5**)** महाराष्ट्र नागरी **(**सेवा जेष्ठतेचे विनियमन**)** नियमावली 1982 अन्वये तात्पुरती सेवाजेष्ठता यादी दरवर्षी 1 जानेवारी रोजी प्रसिध्द करावयाची असताना दिनांक 01/01/2015 रोजीची तात्पुरती जेष्ठता सूची लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

6) नेमणूक आदेश दिलेल्या 295 शिक्षकांपैकी 40 शिक्षक हे अप्रशिक्षीत आहेत**.** त्यांना वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेडवेतन 2000 प्रमाणे वेतन दयावयाचे आहे**.** तथापी याप्रमाणे तालुकास्तरावरुन कार्यवाही केली जात असलेबाबत वेतनदेयके अथवा तालुका गटशिक्षण अधिकारी यांचे अहवाल  उपलब्ध झाले नाही**.**

7) शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक सेप्रनि 1098/प्र.क्र.7/98/12,दिनांक 25/01/1999 अन्वये शासकीय सेवेतील गट अ,ब,व क मधील अधिकारी व कर्मचारी यांनी संगणक हाताळणी /वापराबाबतचे ज्ञान प्राप्त करुन विहीत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य ठरविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने नेमणूकीचे आदेशाचे वेळी 141 शिक्षक हे  संगणक अहर्ता परिक्षा उत्तीर्ण नाहीत तथापि, त्याअनुषंगाने नेमणूकीचे आदेशात कोणताही उल्लेख करण्यात आला नाही.

8) नेमणूक आदेशातील अट क्रमांक 11 नुसार सदर शिक्षकांनी नियुक्ती केलेल्या गावातच वास्तव्य करावयाचे आहे. त्याअनुषंगाने 295 नियुक्त शिक्षक हे नेमणूक दिलेल्या  गावातच वास्तव्य करीत असलेचे अहवाल उपलब्ध झाले नाही**.**

### 3.62 शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम अंतर्गत शिक्षकांना माहिती शिक्षण संवाद ॲबॅकस मुलभूत अभ्यासक्रमाबाबत प्रशिक्षण राबविणेतील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** जिल्हा परिषद शिक्षण प्राथमिक विभागाकडील शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम अंतर्गत माहिती शिक्षण संवाद ॲबॅकस मुलभूत अभ्यासक्रमाबाबत प्रशिक्षण देणेबाबत जिल्हा निधीमधुन खर्च रक्कम रुपये 76,850/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

1) ॲबॅकस प्रशिक्षण देणेसाठी मे.संख्यानिकेतन,पुणे आणि मे.द्रिष्टी ॲकॅडमी प्रा.लि.,पुणे यांची दरपत्रके स्विकृत केलेली आहेत. प्रशिक्षणासंदर्भातील नस्ती व दोन्ही संस्थेकडील उपस्थितीपत्रक तपासता दोन्ही ठिकाणी प्रशिक्षणास उपस्थित असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची नावे व संख्या एकच असल्याचे निदर्शनास आले. संख्यानिकेतन यांनी दिनांक 28/03/2015 ते 28/03/2015 आणि आणि मे.द्दष्टी ॲकॅडमी यांनी 28/03/2015 ते 30/03/2015 रोजी प्रशिक्षण आयोजित केलेले आहेत. सदर प्रशिक्षणासाठी दोन्ही संस्थेमध्ये दिनांक 28/03/2015 रोजी सारखेच 10 शिक्षक उपस्थित होते. एकाच दिवशी शिक्षक दोन्ही ठिकाणी कसे उपस्थित असु शकतात ? मुंबई वित्तिय नियम 1959 नियम 58 वित्तिय औचित्याची सुत्रे दुर्लक्षित केली आहेत व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखासंहिता1968 नियम 39 मधील परिशिष्ट 4 नुसार लेखाविभागाने देयकाची छाननी /तपासणी न करताच नियमबाहय रक्कमेची अदाई केलेली आहे. त्यामुळे दिनांक 28/03/2015 रोजी संख्यानिकेतन,पुणे यांनी दिलेल्या प्रशिक्षणाची शुल्क रक्कम रु.38,450/- प्रदान करण्यात अनियमितता झालेली आहे.

2) प्रशिक्षणासाठी हजर असणा-या सर्व प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

3) मे.द्रिष्टी ॲकॅडमी यांचे 13 प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण देणेसाठी दरपत्रक मंजुर करण्यात आले होते. परंतु सदर प्रशिक्षणास 10 प्रशिक्षणार्थी उपस्थित राहिल्यामुळे अनुपस्थित 3 शिक्षकांकडुन प्रशिक्षणाचा सदर कालावधीचा खर्च वसुल केलेला नाही.

4) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी दिलेल्या आदेशातील अट क्रमांक 6 मध्ये प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर संस्थेमार्फत प्रशिक्षणार्थींची चाचणी परीक्षा घेणेत यावी असे नमुद आहे. सदर संस्थेने प्रशिक्षणार्थींची

चाचणी परीक्षा घेऊन अहवाल सोबत जोडलेला नाही. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या बौध्दीक क्षमतेत वाढ झालेबाबत निकष तपासता आले नाही. सदर प्रशिक्षणाचा फलश्रुती अहवाल उपलब्ध झाला नाही.

**3.63 धान्यादी मालाचे देयकासोबत जोडलेल्या प्रयोगशाळा तपासणी अहवालाबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** जिल्हा परिषद, पुणे शिक्षण विभाग यांचे कडील इयत्ता 1 ली ते 5 वी व 6 वी ते 8 वी वर्गातील विदयार्थ्यांचे पोषण आहारासाठी धान्यादी मालाचे पुरवठा करणेसाठी शासन निधीमधून झालेल्या रक्कम रुपये 82,35,406/- एवढ्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) शासन परिपत्रक शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शापोआ/2009प्र.क्र.383प्राशी-4, दिनांक 26/02/2010 नुसार व शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य पुणे व विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट कोऑपरेटिव कन्झुमर्स फेडरेशन लिमिटेड मुंबई यांचेकडून दिनांक 01/06/2014 रोजी झालेल्या करारनाम्यातील अट क्रमांक 24 अन्वये मुख्य लेखा व वित्त अधिकारी, धान्यादी मालाचे देयकातील प्रथम 90 टक्के रक्कम प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक असलेनंतरच अदा करतील व जिल्हयातील शालेय पोषण आहाराच्या पुरवठया संदर्भात काही तक्रारी असल्यास उर्वरित 10 टक्के रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने अदा करतील असे नमूद असताना प्रस्तुत बिलातील सर्व रक्कम एकाच वेळी अदा केली आहे.

2) अन्न व सुरक्षा मानके नियम 2011 नुसार धान्य पृथ:करण अहवाल फॉम 7 अ नियम 2.4.4 (6)अन्वये पृथ:करण सुरु दिनांक व समाप्ती दिनांकासह नाहीत. तसेच नियम 2.4.2 (5) अन्वये धान्य नमुना माहिती, नमुना भौतीक वर्णन, गोळा केलेल्या नमुन्याबददल माहिती, नमुन्यावर केलेल्या निरिक्षणावरुन न वापरलेल्या पध्दतीबाबत माहिती, आलेले निकाल, अन्न सुरक्षा कायदानुसार असावायचे स्टॅन्डर्ड व आढळून आलेले स्टॅन्डर्ड, भेसळ व चुकीचे ब्रँड इत्यादी बाबत माहिती इत्यादी तपशिल तपासणी अहवालात नमूद नाही.

3) तपासणीसाठी पाठविलेल्या नमून्याची गुणप्रतीबाबत शहानिशा होत नसताना व अहवाल मोघम स्वरुपाचे असतानाही संबंधित तालुक्यातील गटशिक्षण अधिकारी व शालेय पोषण आहार अधिक्षक यांनी सदरचे तपासणी अहवाल प्रमाणित करुन देयके अदा करण्यात आली आहेत. आयोडिन मिठामध्ये कंपनी उत्पादक व दुकानदार यांच्या पुरवठयातील आयोडिनचे प्रती किलो प्रमाण तपासणे गरजेचे असताना तसा कुठेही उल्लेख गुणप्रत अहवालामध्ये प्रमाणित केल्याचे दिसून येत नाही.

4) प्रत्येक जिल्हयात अन्नधान्य रासायनिक प्रयोगशाळा असतानाही अहमदनगर जिल्हयाकडे नमूने पाठवून तपासणी करण्यात आली आहे.

**3.64 प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना इको फ्रेंडली डेस्क बेंच खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा यांनी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना डेस्क बेंच खरेदीसाठी रक्कम रुपये 2,49,96,235/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2012/प्र.क्र.680, दिनांक 31/03/2013 अनुसार 50 लाखावरील खरेदीसाठी सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता नियमबाहयपणे निविदा प्रक्रिया केलेली आहे.

2) सुपरिडेन्स कंपनी ऑफ इंडिया यांचेकडील तपासणी अहवालात नमुने प्राप्त झाले नसल्याचे नमूद आहे. त्यामुळे केवळ कागदोपत्री तपासणी केल्याचे दिसून येते. योग्य कार्यवाहीबाबत पुर्तता आवश्यक आहे.

3) साठा नोंदवहीत क्रमाने व वाटप दिनांकासह नोंद घेण्यात आली नाही.

4) खटाव चलन क्रमांक 102, दिनांक 30/08/2014 ने 150 नग प्राप्त झाल्याचे दिसून येते तथापि अद्याप वाटप झालेले नाही.

5) प्राप्त चलने पाहता अद्याप फलटण 300, कोरेगांव 265, जावली 300 डेस्क बेंच सुस्थितीत मिळाल्याच्या पोहोच पावत्या व वाटप दिसून येत नाही.

**3.65 शालेय पोषण आहरांतर्गत धान्यादी खरेदी खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यासाठी तांदुळ व्यतिरिक्त डाळी, तेल, मीठ, हळद कडधान्ये इत्यादी खरेदीसाठी रुपये 15,82,42,467/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विद्यार्थ्यांची मंजूर संख्या व शिक्षक निश्चितीसाठी घेतलेल्या आकडेवारीवरुन घेतलेल्या विद्यार्थी संख्या यामध्ये तफावत आढळून येते. तसेच समाजकल्याण वसतीगृहातील विद्यार्थ्यांना त्या विभागाकडून अनुदान प्राप्त होत असतांना ती संख्या कमी न केल्याने त्यापोटी जादा खर्च झाला आहे.

2) सन 2013-14 मधील बिलासाठी रक्कम अखर्चित असतांनाही रक्कम रुपये 2,17,31,112/- एवढे प्रदान सन 2014-15 मध्ये केले असून सदर बिलावर व मंजूरी आदेशावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची स्वाक्षरी नाही. नियमबाहय प्रदानामुळे दुबार प्रदानाची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील परिशिष्ट क्रमांक 4 अनुसार सुचनांचे पालन केलेले नाही.

3) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/ सुधायो/प्रशिसं/307/2014-15/3288,दिनांक 11/06/2014 मधील सुचना क्रमांक 1 नुसार करारनामा करण्यात आला असून त्यामधील अट क्रमांक 13 अनुसार पुरवठादार यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सातारा यांच्या कार्यालयात पुरवठा करण्यात आलेल्या आहारासंबंधात पावत्या प्राप्त करुन देणे आवश्यक असतांना पुरवठादार यांनी बिलासोबत अशा प्रकारच्या पिवळया पावत्या सादर केलेल्या नाहीत.

त्यामुळे मागणी केलेल्या तपशिल व रक्कम यांचा प्रत्यक्ष पुरवठा केलेल्या मालाशी मेळ घेता आलेला नाही. सदर पावत्यांअभावी मेळ न घेता बिलांची मंजूरी केली ही बाब अत्यंत गंभीर असून शासन आदेशाचे उल्लंघन करणारी आहे.

4) धान्यादि मालाच्या रकमा महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई यांना प्राप्त झाल्याबाबत पोहोच पावत्या घेण्यात आल्या नाहीत.

5) दिनांक 11/6/2014 रोजी केलेल्या करारनाम्यानुसार आवश्यक धान्यादि मालाचे पुरवठा आदेशाची कागदपत्रे नसल्याने विहीत मुदतीत पुरवठा झाला किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही.

6) करारनाम्यातील अट क्रमांक 9 नुसार पुरवठादार धान्यादि माल 10 किलो, तेल 1 लिटर, मसाल्याचे पदार्थ 100 ग्रॅम या पटीत पुरवठा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

7) करारनाम्यातील अट क्रमांक 22 नुसार पुरवठादार यांनी शाळांना धान्यादि मालाचा किती पुरवठा केला याचे तालुकानिहाय अहवाल दरमहा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सादर केलेले नाहीत. त्यामुळे मागणी रकमेच्या पुरवठयाचा मेळ घेता आला नाही.

8) करारनाम्यातील अट क्रमांक 27 अनुसार देयकाची अदायगी करतांना उद्गम कर कपात करणे आवश्यक असतांना आयकर व व्हॅट वसुली केलेली नाही. आयकर रक्कम रुपये 31,64,849/- व व्हॅट रक्कम रुपये 79,12,123/- वसुली करणे आवश्यक आहे.

9) करारनाम्यानुसार ॲगमार्कच्या वस्तुंचा पुरवठा करणे आवश्यक असून चाचणी अहवालात त्याबाबत उल्लेख नसल्याने नियमबाहय आदाई झाली आहे.

10) जिल्हा मार्केटिंग फेडरेशनकडून तांदुळ व धान्यादि पुरवठा एकाच वेळी करावयाचा आहे. तथापि जुलै 2014, सप्टेंबर 2014, ऑक्टोबर 2014 व जानेवारी 2015 मध्ये तांदुळाचा पुरवठा केलेला नसतांनाही धान्यादि मालाचा पुरवठा केल्याचे दर्शविले आहे.

11) प्राप्त अनुदानापैकी शिल्लक रक्कम रुपये 97061/- शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

**3.66 सतरंजी खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी सतरंजी खरेदीसाठी रक्कम रुपये 24,97,716/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अध्यक्ष, जिल्हा परिषद सातारा यांचे मान्यतेपूर्वीच पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.

2) मूळ दरकरार दिनांक 12/09/2012 चा असून त्याची मुदत दिनांक 30/06/2013 रोजी संपलेली आहे. यास्तव ई निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

3) दरकरारानुसार दर 147.30 प्रति चौरस मीटर आहे. आकारमान 12 फुट x 15 फुट आकारमान म्हणजेच 16.2 चौरस मीटर सतरंजी पुरवठा केल्याने एका नगाची किंमत रुपये 2386.26 एवढी येते. तथापि रुपये 2463.23 प्रमाणे रक्कम आदा केली आहे.

यास्तव रुपये 76.97 प्रतिनग प्रमाणे 1014 नगांची रक्कम रुपये 78048/- जादा आदा रक्कम वसुली करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस/ 1088/2512/उद्योग-6,दिनांक 02/01/1992 अनुसार गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना सुपरिटेंडेंट, कंपनी ऑफ इंडिया (प्रायव्हेट) लिमीटेड, मुंबई या खाजगी कंपनीकडून तपासणी करुन प्राप्त केलेला अहवाल मान्य करता येत नाही.

5) शासनाच्या विविध योजनांद्वारे तसेच जिल्हा परिषदेमार्फत सुध्दा यापूर्वी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचेस खरेदी केली असून शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत चटई, दरीपंजा पुरविण्यात आला असल्याने अनावश्यकरित्या खरेदी केल्याचे दिसून येते.

6) खरेदी सतरंज्या कोणत्या शाळांना वाटप केल्या याची कागदपत्रे नस्तीसोबत नसल्याने खात्री होत नाही.

7) पुरवठा आदेश व करारनामा पाहता करारनामा करण्यापूर्वी पुरवठा आदेश दिल्याचे दिसून येते. सदर बाब नियमबाहय आहे.

8) शिक्षण संचालक, यांचे क्रमांक शापोयो/131/लेखाशा/कार्यविवरण/395,दिनांक 21/01/2000 नुसार लेखाधिकारी, शालेय पोषण आहार यांचे अभिप्राय घेणे आवश्यक असतांना तसे अभिप्राय घेण्यात आले नाहीत.

**3.67 सन 2013 सशस्त्र सेनाध्वजदिन निधी संकलनाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** शिक्षण विभागाकडील सशस्त्र सेनाध्वज दिन निधी संकलनाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद सांगली शिक्षण विभागाकडे सशस्त्र सेना ध्वज दिन निधी संकलन करणेसाठी रक्कम रुपये 13,50,026/- ची पावती पुस्तके प्राथमिक शिक्षण विभागास प्राप्त झाल्याचे नोंदवही व नस्ती वरुन आढळून आले. त्यापैकी कडेगाव व पलुस तालुक्याची रक्कम रुपये 14,655 + 42,000 = 56,655/- भरणा करणे बाकी आहे. तरी सदर रक्कम त्वरीत भरणा करुन पुर्तता लेखापरिक्षणास दाखवावी.

2) पंचायत समिती तासगावला रक्कम रुपये 1,13,000/- ची पावती पुस्तके वाटप केली होती. त्यांनी सैनिक कल्याण कार्यालयाकडे रक्कम रुपये 1,13,418/- भरणा केली आहे. तरी जादा रक्कम रुपये 418/- कोणत्या पावती पुस्तकान्वये जमा करुन भरणा केली याबाबत कागदोपत्री खुलासा करावा.

**3.68 ग्रामीण भागातील तरुण मंडळाना व्यायाम साहित्य पुरविणे खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** शिक्षण विभागाने जिल्हा परिषद स्वनिधीतून ग्रामीण भागातील तरुण मंडळांना व्यायाम साहित्य पुरवणे करिता प्रति संच रक्कम रुपये 26,430/- प्रमाणे 109 संच खरेदीची रक्कम रुपये 28,80,870/- प्रमाणक क्रमांक 1053 दिनांक 31/03/2015 अन्वये मे. सुमित स्पोर्टस अँड फिटनेस इक्विपमेंट पुणे यांना अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, 1961 चे कलम 100 ची अनुसुची पहिली व अधिनियमातील कलम 101 दुसरी अनुसुचीअन्वये जिल्हा परिषदेचे कामाचे विषय निश्चित केले आहेत. सदर सूचीनुसार तरुण मंडळाना व्यायाम साहित्य पुरविणे या शाळाबाहृय बाबीवर खर्च करण्याचा प्राधिकार शिक्षण विभाग जिल्हा परिषद यांना नसताना या बाबीवर नियमबाहयपणे खर्च करण्यात आलेला आहे.

2) सदरची योजना राबविण्यासाठी कोणत्याही प्रकारची निविदा प्रक्रीया राबविली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ जिल्हा परिषदेस मिळाला नाही.

3) सदरचा खर्च शाळाबाहृय बाबींवर करण्यात आल्यामुळे ग्रामीण भागातील मुलांना प्राथमिक शिक्षणाच्या मुलभूत सुविधा पुरवणे या बाबीवर विपरीत परिणाम झाला.

4) ग्रामीण भागातील तरुण मंडळानी व्यायाम साहित्य पुरवठा करणेबाबत जिल्हा परिषदेकडे मागणी केलेली नाही, तथापि शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी पदाधिकाऱ्यांच्या शिफारशीवरुन तरुण मंडळाना पत्र पाठवून त्यांचेकडे मागणी अर्ज मागविले आहेत. सबब मागणी अर्ज नसताना अनावश्यक साहित्य खरेदी केले आहे.

5) खरेदी साहित्य साठा नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक असून त्याचा विनियोग सादर करणे आवश्यक आहे. तथापि याबाबतची नोंदवही सादर केलेली नाही.

6) पुरवठा साहित्याची तपासणी केलेबाबतचा चाचणी अहवाल प्राप्त होण्यापूर्वीच पुरवठादाराचे देयक अदा केले आहे.

वरील नियमबाहृय बाबीमुळे व निविदेशिवाय केलेला खर्च रक्कम रुपये 28,80,870/- वसूल करणे आवश्यक आहे.

### 3.69 अतिरिक्त शिक्षक निश्चितीबाबत.

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती करवीर अधिनस्त असलेल्या शिक्षकांची 30 सप्टेंबर च्या विद्यार्थी संख्येवर केलेली शिक्षक संख्या निश्चिती तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-15 या शैक्षणिक वर्षात 30 सप्टेंबरला असणा-या विद्यार्थी पटसंख्येच्या आधारे करवीर शिक्षण विभागाकडे अतिरिक्त ठरलेल्या 66 शिक्षकांचे समायोजन महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिप.ब-511/प्र.क्र.541/आ/14,दिनांक18/05/2011 अन्वये माहे डिसेंबर 2014 अखेर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही लेखापरीक्षण कालावधीअखेर करणेत आलेली नाही. त्यामुळे अतिरिक्त शिक्षक वेतन व भत्ते पोटी रक्कम रुपये 2,66,32,564/- एवढा खर्च करावा लागला आहे.

2) तसेच सन 2013-14 या शैक्षणिक वर्षात 30 सप्टेंबरला असणा-या विद्यार्थी पटसंख्येच्या आधारे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन विहित मुदतीत न केल्याने सदर शिक्षकांच्या वेतन व भत्तेपोटी झालेला खर्च शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

### 3.70 शालेय पोषण आहारयोजना अनुदान खर्चाबाबत.

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती करवीर यांचे अंतर्गत शालेय पोषण आहार योजना अनुदान खर्चाची तपासणी केली असता एल.पी.जी. गॅस अनुदान वाटपाबाबतच्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपलब्ध अनुदानांतून शिक्षण विभागाने एल.पी.जी. गॅस अनुदान महानगरपालिकेच्या 169 शाळांना केंद्र व राज्य हिस्सा रक्कम प्रमाणक क्रमांक 830,दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 94,89,216/- व प्रमाणक क्रमांक 829,दिनांक 31/03/2015 रुपये 31,63,072/- अशी एकूण रक्कम रुपये 1,26,52,288/- व पंचायत समिती करवीर शाळांना प्रमानक क्रमांक 690,दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 40,72,194/- रक्कम वितरीत केली असून एकूण खर्च रक्कम रुपये 1,67,24,482/- खर्च केला आहे. याबाबतचे अनुदान उपलब्ध होण्याकरिता पंचायत समिती शिक्षण विभागाने प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या MIS PORTAL वर भरलेल्या माहितीच्या आधारे शाळानिहाय

अनुदान प्राप्त झाले आहे, तथापि सदर पोर्टलवर निर्धारीत कालावधीत पोषण आहार शाळांची चुकीची माहिती भरल्याने जादा अनुदान उपलब्ध झाले आहे

2) पोर्टलवर निर्धारीत कालावधीत पोषण आहार शाळांची चुकीची माहिती भरल्याने शिक्षण संचालक प्राथमिक यांचे पत्र क्रमांक जा.क्र.प्राशिस/शापोआ-301/LPG/2015-16/6821/2624 दिनांक 18 जून 2015 अन्वये 600 ताटाकरिता एक सिलेंडर याप्रमाणात अनुदान वाटप करणेस कळवले आहे. त्यामुळे सदर कालावधीत प्रत्यक्षात लाभ घेतलेल्या विध्यार्थी संख्येपेक्षा जादा लाभार्थी विध्यार्थी संख्या नमूद केल्याने महानगरपालिका शिक्षण मंडळास रक्कम रुपये 22,68,208/- व पंचायत समिती शाळांना रक्कम रुपये 5,45,762/- अशी एकूण रक्कम रुपये 28,13,970/- जादा अनुदान वितरीत झालेने ते वसूल करून शासन भरणा करणे आवश्यक आहे.

3) अनुदान मंजूरी आदेशाप्रमाणे दिनांक 18/09/2012 ते 31/03/2013 या कालावधीत एल.पी.जी सिलेंडरचा वापर करुन शालेय पोषण आहार शिजवणा-या शाळांनाच अनुदान देय असल्याने सदर कालावधीत एल.पी.जी सिलेंडर वापर करुन आहार शिजवला असलेबाबत खात्री केली नाही, त्यामुळे अदयाप सदर अनुदान रक्कमा शाळा मुख्याध्यापकांच्या बँक खाती विना वाटप शिल्लक आहेत त्यामुळे शासन अनुदानाची रक्कम नाहक अडकुन पडली आहे.

4) तसेच पोषण आहार शिजवणे स्वयंपाकी मानधन करिता महानगरपालिका व पंचायत समिती शाळांना रक्कम रुपये 5,27,09,917/- तर मदतनीस मानधन करिता रक्कम रुपये 81,95,900/- इतकी वितरीत केली आहे. तथापि दिनांक 28/10/2014 च्या शासन निर्णयाप्रमाणे प्रत्यक्ष खर्च व लाभार्थी संख्या यांचा मेळ घेण्यात आलेला नाही.

### 3.71 अतिरिक्त शिक्षक निश्चितीबाबत.

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती गडहिंग्लज गट विकास अधिकारी यांचे अधिनस्त असलेल्या शिक्षकांची 30 सप्टेंबर च्या विद्यार्थी संख्येवर केलेली शिक्षक संख्या निश्चिती तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2014-15 या शैक्षणिक वर्षात 30 सप्टेंबरला असणा-या विद्यार्थी पटसंख्येच्या आधारे गडहिंग्लज शिक्षण विभागाकडे अतिरिक्त ठरलेल्या 15 शिक्षकांचे समायोजन महाराष्ट्र शासन, गामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.प.ब-511/प्र.क्र.541/आ/14,दिनांक 18/05/2011 अन्वये माहे डिसेंबर 2014 अखेर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही लेखापरीक्षण कालावधीअखेर करणेत आलेली नाही. त्यामुळे अतिरिक्त शिक्षक वेतन व भत्ते पोटी रक्कम रुपये 86,70,000/- एवढा खर्च करावा लागला आहे.

### 3.72 जिल्हा परिषद सेस मधून संगणक खरेदीबाबत.

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** संगणक खरेदीबाबत योजनेवर रक्कम रुपये 1,05,42,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संगणक खरेदीबाबतची तरतूद सन 2012-2013 मधील असताना सन 2013-2014 मध्ये खर्च करण्यासाठी जि.प.सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यात आलेली आहे. सदर बाबतचे कोणतेही दस्तऐवज तपाससनीस उपलब्ध झाले नाही.

2) प्रशासकीय मंजुरी व तांत्रिक मंजुरीने मे. नेटस्मार्ट सिस्टीम सोलापूर यांना 264 संगणक रुपये 34,067/- प्रती संगणक या दराने रुपये 89,93,688/- इतक्या रकमेचा HCL कंपनीचे दर करारपत्रकाप्रमाणे पुरविण्याबाबत पुरवठा आदेश कढण्यात आलेला होता. तथापि सदरचा आदेश कोणत्या कारणाशिवाय रद्द करण्यात आलेला होता याचा खुलासा झालेला नाही.

3) सदर पुरवठा आदेश रद्द करून प्रशासकीय मंजुरी व तांत्रिक मजुरी देऊन मे साई कॉम्पुटर्स सोलापूर यांच्याकडून 251 संगणक रुपये 42,000/- दराने रुपये 1,05,42,000/- रकमेचे संगणक खरेदी केलेले आहेत. सदर खरेदी प्रक्रिया राबविताना Intel core i3 o/s-windows 8 HCL info systems ltd (विक्रेता मे 4) नेट स्मार्ट

सिस्टीम सोलापूर) व lenova india pvt ltd (विक्रेता मे साई कॉम्पुटर सोलापूर) या दोन संस्थेचा दर करार असून दोन्ही संस्थाचे दर रुपये 40,000/- आधिक 5 टक्के vat रु 42000 एकच किमत असताना सदरचे 251 संगणकाचा पुरवठा आदेश मे.साई कॉम्पुटर सोलापूर यांनाच का देण्यात आला याचा खुलासा होणे आवशयक आहे.

1) संगणक योग्य त्या दर्जाचे प्राप्त झाले याबाबत खात्री करता आलेली नाही.

2) शिक्षण संचालक (प्राथ), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक 03/03/2014 तांत्रिक माण्यतेमध्ये अट क्रमांक 5 अन्वये निश्चित केलेल्या लाभार्थ्यांना विद्यार्थी संख्ये नुसार पुरवठा होईल याची दक्षता घेणेबाबत सूचना आहेत. 251 संगणकाचे वाटप ज्या शाळांना करण्यात आले त्याबाबत कोणते निकष लावण्यात आले याबाबत कोणतेही कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. शाळांकडून / गटशिक्षण अधिकारी यांचेकडून संगणकाची मागणी झाली होती याबाबत खात्री करता आली नाही.

3) खर्चाचा अहवाल विहित कालावधीत शासनास व शिक्षण संचालनालयास तसा अहवाल सादर केलेला नाही.

4) पूर्वीच्या मे नेट स्मार्ट सोलापूर यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील अट क्रमांक 4 नुसार विलंबाने पुरवठा झाल्यास किमतीच्या 1/2 टक्के प्रती आठवडा असा दंड आकाराला जाईल असे स्पष्ट नमूद करण्यात आले होते. तथापि सदर आदेशामध्ये अशी कालावधीची अट का नाही याचा खुलासा केलेला नाही.

5) संगणक 45 दिवसात मे 2014 च्या दुसरी आठवड्यात पुरविणे आवश्यक होते. तथापि सदर संगणक सप्टेंबर 2014 च्या चौथ्या आठवड्यात पुरवठा करण्य्यात आलेले आहेत. जिल्हा परिषद शाळा सोलंकरवाडी तालुका माढा यांना दिनांक 04/10/2014 रोजी प्राप्त झाला आहे. 19 आठवडे विलंब झाला आहे. विलंबाने पुरवठा केल्यामुळे रुपये 7,82,040/- दंड वसूल करण्यात यावा.

6) नेट स्मार्ट सिस्टीम्स सोलापूर यांना दिलेला पुरवठा आदेश क्रमांक प्राथमिक शिक्षण विभाग सो.जि.प.सो-जा.क्र./सोजिपसो/प्राशी-5/कावी/13,दिनांक 27/03/2013 अन्वये रुपये 34,067/- इतका दर असताना आवश्यक असणारा निधी उपलब्ध आसताना प्रशासकीय मजुरी तांत्रिक मंजुरी असताना परत उशीरा संगणक खरेदी केल्यामुळे रुपये 42,000/- ला एक याप्रमाणे खरेदी केलेले आहे. त्यामुळे रुपये 7,933/- इतके प्रती संगणकाप्रमाणे जिल्हा परिषदेचे नुकसान झालेले आहे. एकूण 251 x 7933 = रुपये 19,91,183/- जबाबदार असणाऱ्या व्यक्ती कडून रक्कम वसूल करण्यात यावी.

7) पूर्वीच्या मे नेट स्मार्ट सिस्टीम्स सोलापूर यांच्या दिनाकं 27/03/2013 च्या आदेशामध्ये 264 संगणक मिळणार होते. परंतु नवीन पुरवठा आदेश दिनांक 03/03/2014 मुळे 251 म्हणजेच 13 संगणक कमी मिळाल्यामुळे जिल्हा परिषद च्या 13 शाळा व त्यामधील विद्यार्थी संगणकापासून वंचीत राहिलेले आहेत.

8) शिक्षण विभागामध्ये साठा नोंद वही ठेवण्यात आलेली नाही त्यामुळे संगणकाचे वाटप योग्य रीतीने झालेबाबत खात्री करता आली नाही.

9) 251 संगणकाचा तपासणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध नाही.

10) नेट स्मार्ट सिस्टीम सोलापुर यांना दिनांक 27/03/2013 रोजी देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करून मे साई कॉम्पुटर्स सोलापूर यांचेकडून जड दराचा पुरवठा आदेश देण्यात आला, त्याबाबतचा तपशील, टिपण्या, कारणे, इत्यादी कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

11) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोलकनवाडी यांना दिनांक 04/10/2014 रोजी संगणक मिळाल्याबाबत पोच पावती आहे. तथापि सर्व संगणकाचे म्हणजे दिनांक 10/10/2014 रोजी रुपये 94,35,090/- इतके प्रदान करण्यात आले सर्व संगणकाचे इंस्टालेशन केले की नाही याबाबत सक्षम प्राधिकारी यांचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

**3.73 प्राथमिक शाळांना पुरविण्यात आलेल्या यु पी ए एस खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडील सन 2014-2015 मधील प्राथमिक शाळांना पुरविण्यात आलेल्या यु पी ए एस करीता रक्कम रुपये 14,10,745/- एवढा खर्च नोंदविण्यांत आलेला आहे. सदर बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 96 नुसार साहित्य पुरवठादार रक्कम अदा करणेपुर्वी साहित्याची नोंद साठा नोंदवहीत घेऊन त्याचा प्रती संदर्भ उपप्रमानाकावर देणेचा आहे. तथापि शिक्षण विभाग प्राथमिक यांनी यु पी एसची नोंद साठा नोंदवहीत न घेता पुरवठादारास सर्व रक्कम अदा करण्यात आली आहे.

2) गट स्तरावरील शालेय मागणी तपासनीस उपलब्ध झाली नाही. त्यामुळे मागणीप्रमाणे खरेदी व पुरवठा झाल्याची खात्री करता आली नाही.

3) वाटप साहित्याचे उपयोगिता प्रमाणपत्र तपासनीस उपलब्ध झाले नाही.

4) यु पी एस पुरवठा हा दिनांक 03/05/2014 च्या आत करण्याचा असताना विलंबाने पुरवठा झालेला आहे. पुरवठा आदेशातील अटीनुसार प्रती आठवडा 1/2 टक्के दंडची रक्कम रुपये 7,054/- प्रती 40 आठवड्याप्रमाणे रक्कम रुपये 2,82,160/- वसूल करण्याएवजी रक्कम रुपये 7,054/- वसूल केलेली आहे. रक्कम रुपये 2,75,106/- संबधीत व्यक्तीकडून वसूल करावे.

**3.74 जिल्हा परिषद सेस मधून संगणक खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** संगणक खरेदीबाबत योजनेवर रक्कम रुपये 52,50,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरची तरतूद सन 2013-2014 मधील असताना सन 2014-2015 मध्ये खर्च करण्यासाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यात आलेली आहे सदर बाबतचे कोणतेही दस्त ऐवज तपासनीस उपलब्ध झाले नाहीत.

2) Intel core i3 o/s -windows 8 चे HCL INFOSYSTEMS LTD (विक्रेता मे नेट स्मार्ट सिस्टीम सोलापूर ) व LENOVA INDIA PVT LTD (विक्रेता मे साई कॉम्पुटर्स सोलापूर ) या दोन संस्थांचे दर करारपात्र असून दोन्ही संस्थांचे दर रुपये 40,000/- अधिक 5 टक्के VAT अशी रुपये 42,000/- एकाच किमत असताना व दिनांक 03/03/2014 टिपणीमध्ये सदर बाब नमूद असताना सदरची 125 संगणकाचा पुरवठा आदेश मे साई कॉम्पुटर्स यांनाच का देण्यात आला.

3) 125 संगणकाचा पुरवठा करण्यात आलेला असून त्यांचा सक्षम संस्थेकडील तपासणी अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

4) माननीय शिक्षण संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दिनांक 03/03/2014 च्या तांत्रिक मानयतेमध्ये अट क्रमांक 5 अन्वये निशित केलेल्या लाभार्थी शाळामधील विद्यार्थी संख्येनुसार पुरवठा होईल याची दक्षता घेणेबाबत स्पष्ट सूचना आहेत तथापि सदरच्या 125 संगणकाचे वाटप ज्या शाळांना करण्यात आले याबाबत कोणते निकष लावण्यात आले याबाबत कोणते अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. तसेच सदर शाळाकडून /गटशिक्षण अधिकारी यांचेकडून सदर संगणकाची मागणी झाली होती याबाबत खात्री करता आलेली नाही.

1) योजनेवर झालेला खर्चाचा अहवाल शासनास व शिक्षण संचानालयास सदर केल्याचे दिसून येत नाही.

2) प्रशासकीय मान्यता प्राथमिक शिक्षण संचालक पुणे यांची तांत्रिक मान्यता व पुरवठा आदेश हे एकाच दिवशी म्हणजेच दिनांक 03/03/2014 ला देण्यात आलेले आहे .याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) प्रशासकीय मान्यतेवर मा.मु.का.अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

4) विहित कालावधीत पुरवठा केल्याबाबत खात्री करण्यासाठी जड संग्रह नोंदवही तपासनीस उपलब्ध झालेले नाही. तरी सदर बाबत खात्री करून दंडाची आकारणी करण्यात यावी.

5) सदर संगणक पुरवठा देयकावर जड वस्तू संग्रह नोंदवहीचा पान क्रमांक नमूद नाही.

**3.75 शालेय पोषण आहार योजनेमधील अनियमिततेबाबत. (शासकिय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत शिक्षण विभागाने सन 2014-2015 मध्ये शालेय पोषण आहार योजनेवर रुपये 10,88,17,419/- खर्च केला आहे. या करीता शासन निर्णय क्रमांक शापोआ 2009/प्र,क्र, 136 /प्रशि 4, दिनांक 15/07/2009 अन्वये अमरावती जिल्हा करीता प्राथमिक वर्ग 1 ते 5 व माध्यमिक वर्ग 6 ते 8 करीता तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा शाळांना करण्याकरीता व्यवस्थापक, दि महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबई आणि शिक्षण संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दरम्यान दिनांक 11/06/2014 रोजी करार करण्यात आला. करारात एकुण 40 अटी व शर्तीचा समावेश आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारातील अट क्रमांक 27 नुसार उद्‌गम कपात (TDS) करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक आयकर 1007/प्र.क. 105/ कोषा 5 दिनांक 22/02/2008 व आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) नुसार 2% आयकर कपात न केल्याने रुपये 21,76,348/- एवढया रकमेचे शासनाचे नुकसान झाले आहे.

2) करारनाम्यातील अट क्रमांक 24 नुसार पुरवठादारास प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल समाधानकारक आल्यानंतर 90% प्रदान व कोणतीही तक्रार नसल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने 10% प्रदान करावयाचे होते. मात्र पुरवठादारास एकत्रीत 100% प्रदान केल्याने रुपये 1,08,81,742/- चे नियमबाहय प्रदान करण्यात आले आहे.

3) करारनाम्यातील अट क्रमांक 3 नुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे मार्फत एकत्रीत मागणी नोंदविणे आवश्यक असतांना पंचायत समितीद्वारे परस्पर मागणी नोंदविण्यात येते. त्यामुळे पंचायत समिती यांनी केलेली मागणी व शिक्षणाधिकारी यांची मंजुरी यात तफावत राहु शकते.

4) पंचायत समिती धामणगाव रेल्वे अंतर्गत माहे ऑक्टोबर-नोव्हेबर व डिसेंबर-जानेवारी चे पुरवठा आदेश कालावधी संपल्यानंतर देण्यात आले. धान्यादी मालाचा पुरवठा संबधित कालावधीचे वीस दिवस अगोदर करणे आवश्यक असतांना तसे निर्देश डावलण्यात आल्याचे दिसून येते.

5) डिसेंबर-जानेवारी या कालावधीचा पुरवठा आदेश 02/02/2015 रोजी दिल्यानंतर लगेच 04/02/2015 रोजी साहित्य चाचणी करण्याबाबत कळविण्यात आले त्यामुळे दोनच दिवसात शाळांना साहित्य पुरवठा झाल्याचे दिसुन येते.

6) करारनाम्यातील अट क्रमांक 13 नुसार देयकासोबत पुरवठादाराने पिवळया रंगाच्या पावत्या जोडणे आवश्यक आहे. मात्र सदर पावत्या पंचायत समिती स्तरावर ठेवल्या जात असल्याने मालाचा पुरवठा प्रत्यक्ष कधी झाला हे तपासता आले नाही. तसेच गटशिक्षिणाधिकारी व शालेय पोषण आहार अधिक्षक यांनीही दिलेल्या प्रमाणपत्रावर माल केव्हा प्राप्त झाला हे नमुद केले नाही. त्यामूळे मालाचा पुरवठा विहित मुदतीत झाला किंवा कसे याचा बोध होत नाही.

7) देयकासोबत जोडावयाच्या पिवळया रंगाच्या पावतीवर मुख्याध्यापकांनी दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष माल केव्हा प्राप्त झाला याचा बोध होत नाही.

8) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी धारणी चिखलदरा या अतिदुर्गम भागासाठी जुन ते ऑगस्ट 2014 या तीन महिन्यासाठी तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा करण्याचे आदेश दिले.परंतु पुरवठादारने जुन व जुलै या दोनच महिण्यासाठी पुरवठा केल्याचे उपप्रमानकावर नमुद आहे. त्याप्रमाणे देयकाची रक्कम अदा करण्यात आली. सदर बाब अनावधानाने झाल्याचे पुरवठादाराने स्पष्टीकरण दिले आहे यावरुन पुरवठयाबाबत खबरदारी घेतली जात नसल्याचे दिसून येते.

9) करारनाम्यातील अट क्रमांक 3(अ) नुसार पुरवठादाराने मागणीप्रमाणे मालाचा पुरवठा केला पाहीजे. सन 2014-2015 साठी केलेल्या करारातील अट क्रमांक 2 नुसार तिखटा ऐवजी कांदा, लसुन, मसाला याचा पुरवठा करावयाचा होता. परंतु पुरवठादाराने धारणी, चांदुर बाजार, चिखलदरा, नांदगाव खंडेश्वर, तिवसा, वरुड व अचलपुर

या सात पंचायत समितीनां तिखटाचा पुरवठा केला आहे. पुरवठादाराने तिखटाचा जुना साठा संपविण्यासाठी हा पुरवठा केला असण्याची शक्यता आहे. अट क्रमांक 25 नुसार मागणी आदेशातील एखादया वस्तुचा पुरवठा न केल्यास संपुर्ण देयक अदा केले जाणार नाही असे नमुद असतांना सदर देयक प्रदान करण्यात आली. त्यामुळे प्रदान केलेली रक्कम रुपये 19,65,540 आक्षेपाधीन ठेवण्यात येते आहे.

10) पुरवठादाराने करारनाम्याप्रमाणे मान्य दरापेक्षा जादा दाराने देयक सादर केल्यामुळे रुपये 1,292/- चे जादा शोधन झाले आहे. सबब रक्कम पुरवठादाराकडुन वसुल करून अनूपालन दर्शवावे.

11) माहे जुन ते सप्टेंबर या कालावधीत पंचायत समितीने मसाल्याचे पदार्थांची 100 ग्रॅमचे पटीत मागणी नोंदविली असतांना पुरवठादाराने 500 ग्रॅमच्या पटीत पुरवठा केल्याने शाळांना कमी जास्त पुरवठा झाला आहे. ज्या ठिकाणी कमी प्रमाणात किंवा मुळीच पुरवठा झाला नाही त्या ठिकाणी मुलांना सकस शालेय पोषण आहारापासुन वंचीत राहावे लागले.खुलासा करावा.

### 3.76 अपंग कर्मचारी उपकरणे खरेदी बाबत.

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** शिक्षण विभागाने अपंग कर्मचारी उपकरणे खरेदीवर रुपये 7,51,443/- खर्च केलेला असून यामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळतात.

1) योजना राबवितांना एकूण 115 शिक्षक अपंग असल्याचे नस्तीवरून दिसून येते. सदर योजना प्रसिद्धी न देता राबविण्यात आली.

2) 115 अपंग शिक्षकांबाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

3) 115 अपंग शिक्षक असतांनाही केवळ 11 शिक्षक अपंग असल्याचे विवरणपत्रात दर्शविण्यात आले.

4) शिक्षण विभागाची योजना असतांना शिक्षण विभागाने विषय सभेपुढे ठेऊन योजना राबविल्याचे स्पष्ट होत नाही.

5) अपंग शिक्षक यांना उपकरण खरेदी करावयाचे अर्ज लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.त्यामुळे कुठले उपकरण अपेक्षित होते हे स्पष्ट होत नाही.

6) उपकरणाऐवजी वाहन खरेदी करावे असे नमुद नसतांनाही वाहन खरेदी करावयाचे प्रयोजन स्ष्ट होत नाही.

7) सर्व प्रवर्ग निहाय यादी मंजूर न करता 14 शिक्षक यानांच उपकरण खरेदी करून दिले इतर प्रवर्गाचा विचार करण्यात आला नाही.

8) खरेदी करण्यात आलेल्या उपकरणांची मागणी काय होती हे स्पष्ट होत नाही.साहित्य प्राप्ती बाबत नोंदी आढळून आल्या नाहीत.

9) योजनेची फलश्रृती झाली किंवा नाही याची विभागाने खात्री केली नाही.

### 3.77 माध्यमिक शाळांना डेक्स बेंच खरेदीतील गंभीर अतियमितता.

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** जिल्हा परिषद अकोलाचे शिक्षण विभागाने माध्यमिक शाळांना डेक्स बेंच खरेदीवर रुपये 47,49,914/- खर्च केल्याचे आढळते मात्र नियमानुसार खर्च न केल्याने याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) डेक्स बेंच खरेदीबाबत मागणी ही सभेनंतर असल्याचे निदर्शनास आले.

2) नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक 27/01/2012 नुसार 13 वा वित्त आयोगातून तथा विभागाचे पत्र क्रंमांक 1226/6162 नुसार जिल्हाधिकारी यांनी निधी उपलब्ध करून दयावयाचे पत्रानुसार खरेदी अपेक्षित असतांना जिल्हा परिषद उपकर निधीतून खरेदी केली.

3) शाळांची विदयार्थी निहाय मागणी उपलब्ध झाली नाही.

4) शाळेची यादी निश्चित करून त्यास विषय समितीची मान्यता नाही.

5) खरेदी केलेल्या साहित्याचे गुणवत्तेबाबत खात्री पटली नाही.

6) शाळेला माल उशीरा पोहचला मात्र त्यावर 5 टक्के दंड वसूल केला नाही.

7) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय दिनांक 20/06/2008 नुसार विहित कालावधीत योजना राबविणे आवश्यक असतांना सन 2013-14 मध्ये निधी उपलब्ध असतांना सन 2014-15 या वित्तीय वर्षात देयके मंजूर करून प्रदान केली.

8) शाळेच्या साठा पुस्तकानुसार व अहवालानुसार फरक आहे.

9) शासकिय तंत्र निकेतन महाविदयालयाच्या तांत्रिक तपासणीच्या पत्रात शाळेचे नाव नमुद नाही.माल प्राप्त झाल्यावर 90 टक्के प्रदान करणे आवश्यक असतांना 100 टक्के प्रदान केले.

10) शाळेचे साठा पुस्तकानुसार वर्ग निहाय डेक्स बेंचची नोंद नाही.

11) हिवरखेडच्या शाळेच्या साठापुस्तकात वस्तु प्राप्त झाल्याबाबत नोंद नाही.

12) जिल्हा परिषद माध्यमिक शाळा अकोट यांना दोनवेळा माल देण्यात आला.

13) सावित्रीबाई फुले माध्यमिक शाळा यांचे कडील मागील डेक्स बेंच नमुद नाहीत. अहवालात 325 दर्शविण्यात आलेले आहेत.

14) योजनेची फलश्रृती झाली किंवा नाही याची विभागाने खात्री केली नाही.

**3.78 दिनांक 30/09/2014 चे पटसंख्येनुसार अनुज्ञेय शिक्षकांचे समायोजन न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** दिनांक 30/09/2014 चे पटसंख्येनुसार 676 अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न केल्याने खालील अनियमितता आढळतात.

1) दिनांक 30/09/2014 चे पटसंख्येनुसार अकोला जिल्हयात मराठी उर्दु शाळेतील एकूण 676 अतिरिक्त शिक्षक आहेत.

2) जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समायोजन करण्याचे अधिकार असतांना शासन निर्णय 06/10/2008 च्या मार्गदर्शक तत्व 1 नुसार समायोजन केले नाही.

3) शिक्षकांचे मुळ आदेश, रुजू अहवाल नस्ती उपलब्ध नाहीत, अतिरिक्त शिक्षकाची वेतन भत्त्याची माहिती सादर न केल्याने वेतन भत्त्याचे प्रदानाबाबत अभिप्राय देता येत नाही.

4) शिक्षकांना काम नसतांना जास्तीचे वेतन व भत्ते अदा करावे लागत आहे.

**3.79 शालेय पोषण आहार अंतर्गत स्वयंपाकी/मदतनीस यांचे मानधनावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 25) -** जिल्हा परिषद अकोलाचे शिक्षण विभागाने शालेय पोषण आहार अंतर्गत स्वंयपाकी/मदतनीस यांचे मानधन प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-2015 मधील बार्शिटाकळी येथील एकूण 12 शाळांपैकी सहा शाळा एक महिना तर सहा शाळा तीन महिने बंद असलेल्या कालावधीत स्वयंपाकी/मदतनीस यांना मानधन रूपये 3,20,619/- वाटप करण्यात आले. शाळा बंद असतांना मानधन देणेची स्पष्टता करणे आवश्यक वाटते.

**3.80 शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदुळाच्या उचल व वाटपातील नियमबाहयतेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदुळाच्या उचल व वाटपात खालीलप्रमाणे अनियमितता आढळतात.

1) पुरवठादाराच्या करारनाम्यातील अटीनुसार पुरवठादाराने पुरविलेल्या मालाच्या पावतीवर आहार शिजवणा-या यंत्रणेची पिवळया पावतीवर स्वाक्षरी नाही. पुरवठादाराने नियतन आदेशानुसार केलेली उचल, शाळांना केलेला पुरवठा व शिल्लक साठा बाबत माहिती उपलब्ध नाही.

2) शिक्षण अधिकारी यांनी गोदामाची तपासणी न करणे, उचल व पुरवठा यातील तफावतीचे विवरणपत्र तयार न करणे, उचल पुरवठा, शिल्लक साठा या संबधात माहिती उपलब्ध करुन न देणे इत्यादी बाबत खुलासा करावा.

**3.81 शालेय पोषण आहार योजने अंतर्गत झालेल्या नियमबाह्य प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 27) -** शालेय पोषण आहार योजने अंतर्गत धान्य पुरवठयावर रुपये 13,31,684/- खर्च नमुद करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन लिमिटेड यांना धान्यादी पुरवठा करण्याचा आदेश दिला असून त्यांनी विहित मुदतीत मालाचा पुरवठा केला नाही.

2) डिलेव्हरी मेमो मध्ये पॅकींग दिनांक, मुदत, कंपनीचे नाव नाही.

3) त्यावर मुख्याध्यापक व बचतगट यांची पोच नाही तसेच आहार शिजवणारी यंत्रणा व बचतगटा समोर वजन केले नाही.

4) पुरवठा आदेश ज्या महिन्यात धान्याची आवश्यकता आहे त्या महिन्या अगोदर पुरवठा आदेश देणेत आलेला नाही.

**3.82 विदयार्थ्यांकरीता बुट खरेदी योजनेतील अनियमिततेबाबत (जिल्हा परिषद उपकर).**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 28) -** जिल्हा परिषद, अकोला अंतर्गत शिक्षण विभागाने विदयार्थ्यांकरीता बुट खरेदी योजनेवर रुपये 49,99,890/- खर्च केल्याचे आढळते याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठादाराला पुरवठा आदेश दिनांक 28/03/2013 ला दिलेला आहे. व करारनामा रूपये 4,100/- च्या स्टॅम्प पेपरवर दिनांक 10/04/2013 ला केला आहे. करारनामा प्रथम करून त्यानंतर पुरवठा आदेश देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) दरकरारामध्ये पुरवठा कालावधी मागणीपत्र मिळाल्यापासुन 12 आठवड्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु पुरवठा आदेशात दिनांक 30/03/2013 पुर्वी पंचायत समिती स्तरावर पुरवठा करावा लागेल असे नमुद आहे. दरकरारातील पुरवठा कालावधी व पुरवठा आदेशातील पुरवठा कालावधी यामधील तफावतीबाबत खुलासा करावा.

3) डिलेवरी चलन वरील दिनांक व साठा नोंदवहीतील माल प्राप्त दिनांक यामध्ये तफावत आढळून आली. त्यामुळे विलंबाने पुरवठा केल्याबाबत पुरवठादाराचे देयककाडून रूपये 77,670/- दंड वसुल करण्यात यावा.

4) माल स्विकारतांना मागणी करणाऱ्या कार्यालयाने तपासणी करूनच माल स्विकारावा असे नमुद आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही. माल प्राप्त झाल्यानंतरच्या दिनांक 12/09/2013 चे तपासणी अहवाल आहेत.

5) शिक्षण विभाग पत्र क्रमांक 4614/13,दिनांक 04/09/2013 अन्वये डायरेक्टर सुपरीटेंडट कंपनी ऑफ इंडीया प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांना शूजची तांत्रिक तपासणी बाबत. पत्र दिले त्यामध्ये साहित्याचे वर्णन 1) साईज 9 ते 1 दर 203 2) साईज 2 ते 5 दर 231 3) साईज 6 ते 10 दर 372 च्या नगांची तपासणी करून अहवाल देण्याची विनंती केली रुपये 231 व 372 दराचे साईजचे शुजचा पुरवठा आदेश दिला नसताना त्या शुजचे तपासणी करणे बाबतचे प्रयोजन काय खुलासा करावा. दिनांक 12/9/2013 चे तपासणी अहवालात फक्त बाईज डर्बी व गर्ल बेली शुज नमुद आहे. कोणते साईजचे शुजचे तपासणी अहवाल आहे नमुद नाही. त्यामुळे सदर तपासणी अहवाल योग्य असल्याबाबत साशंकता वाटते.

6) पंचायत समितीची साठा नोंदवही साहित्य वाटप शाळांच्या मुख्याध्यापकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. परंतु सदर साहित्ये प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना वाटप केल्याबाबत विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्यांसह प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

7) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 6 साहित्याचा पुरवठा सुस्थितीत व निर्देशाप्रमाणे प्राप्त झाल्याबाबत संबंधीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापकांचे स्वाक्षरीतील पोच पावत्या शिक्षण विभागास सादर करावे

लागतील त्या शिवाय देयक स्विकारल्या जाणार नाही असे नमुद आहे. परंतु पुरवठा दाराने तश्या पोचपावत्या सादर केल्याचे लेखापरीक्षणात आढळून आले नाही.

8) सदर योजना राबविल्याने विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत किती वाढ झाली याबाबत फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही त्यामुळे योजना राबविण्याचा उद्देश सफल झाला किंवा कसे हे सांगता येत नाही.

**3.83 शालेय पोषण आहार माहे आक्टोबर 2014 व नोव्हेंबर 2014 चा पुरवठा न केल्याने शालेय पोषण आहार बंद असणेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 29) -** शिक्षण विभागाने माहे आक्टोबर 2014 ते डिसेंबर 2014 चा तांदळाची 908 टनाची मागणी नोंदवली होती. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शिक्षण संचालक यांना तसेच भारतीय खाद्य निगम नागपूर यांना माहे आक्टोबर 2014 व नोव्हेंबर 2014 चा तांदळाचा पुरवठा झाला नसल्याबाबत कळवून सुदधा त्यांनी कोणतीही उपाय योजना न केल्यामुळे विदयार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित राहीले त्यामुळे योजना राबविण्याचा उददेश सफल झाला नाही.

**3.84 शालेय पोषण आहार धान्यादी माल व इतर साहित्याचा पुरवठा व खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सन 2014-2015 मध्ये शिक्षण विभाग, जिल्हा परिषद वाशिम, यांनी शालेय पोषण आहार धान्यादी माल खरेदीवर रुपये 5,56,37,466/- खर्च करण्यात आला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई यांचेसोबत झालेल्या करारनाम्यातील अट क्रमांक 3(अ) नुसार मागणी नुसार पुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु विभागाला अर्धसमास पत्र क्रमांक 1 दिनांक 04/12/2015 नुसार मागणी करुनही पुरवठा आदेशाची प्रत लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध केली नाही. त्यामुळे पुरवठादाराने मागणी नुसार पुरवठा केला असल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) शिक्षण विभागाने शालेय पोषण आहार रुपये 5,56,37,466/- ची पुरवठा दाराची देयके पारीत केली आहेत. करारनाम्यातील अट क्रमांक 27 नुसार करारात नमुद केलेले दर हे सर्व करासहित असुन देयकाची अदागयी ही उदगम कपात (Tax deduction at source) करण्यात येतील. करीता रुपये 5,56,37,466/- च्या 2 टक्के रुपये 11,12,749/- आयकर व त्यावर 3 टक्के शिक्षण उपकर रुपये 33,382/- असे एकुण 11,46,131/- रक्कमाची कपात आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 नुसार पुरवठा दाराने केली असल्याबाबत आयकर विभागाचे दस्ताऐवज शिक्षण विभागास सादर केले नाही. करीता आयकर कपात केल्याबाबत पडताळणी करता आली नाही. पर्यायाने शासनाचे रुपये 11,46,131/- नुकसान झाल्याचे निदर्शनास येते.

3) करारनाम्यातील अट क्रमांक 24 नुसार मालाच्या देयकाच्या रक्कमे पैकी 90 टक्के रक्कम प्रयोग शाळेची तपासणी अहवाल समाधानकारक आल्यानंतर अदा करतील असे नमुद असतांना व पुरवठा संदर्भात काही तक्रारी असल्यास उर्वरीत 10 टक्के रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने अदा करतील. परंतु विभागाने प्रयोगशाळा तपासणी अहवाल नसतांना नियमबाहयपणे एकाच वेळेस 100 टक्के रक्कम अदा केली.

4) करारनाम्यातील अट 3(अ) नुसार शाळा निहाय मागणी नुसार, पुरवठा आदेशाप्रमाणे विहीत कालावधीत पुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु पुरवठा आदेश न देताच पुरवठा करण्यात आला आहे.

5) करारनाम्यातील अट क्रमांक 3(ड) नुसार पुरवठा धारकाने वाहन चालकाचे नाव व फोन नंबर शिक्षणअधिकारी व गट शिक्षण अधिकारी यांचे कडे देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. तसेच पोचपावतीवर सुध्दा वाहन क्रमांक नमुद केल्याचे दिसून आले नाही.

6) करार नाम्यातील अट क्रमांक 7 अन्वये मागणी नुसार पुरवठा करणे आवश्यक असतांना पुरवठा धारकाने मसाल्याचे पदार्थाचा पुरवठा कमी केल्याचे निदर्शनास आले. अपुरा पुरवठा केल्यास करारनामा रदद करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. उदा. पंचायत समिती वाशिम वर्ग 1 ते 5 चा मागणी व पुरवठा.

7) करारनाम्यातील अट क्रमांक 17 नुसार जास्तीत तास्त 20 दिवसाच्या आत पुरवठा करणे आवश्यक असतांना पंचायत समिती मालेगाव यांना 1 ते 1 ½ महिना पुरवठा विलंबाने केल्याने पुरवठाधारकावर दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

8) करारनाम्यातील अट क्रमांक 21 अ,ब,क नुसार धान्यादी मालाचे नमुने प्रत्येक शाळेकडून घेवून त्याची तपासणी करणेसाठी शासकीय प्रयोगशाळेमध्ये पाठविणे आवश्यक असतांना सरसकट चाचणी अहवाल पाठविले.

9) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.383/प्राशि-4 मंत्रालय मुंबई 400032 दिनांक 26/02/2010 नुसार शालेय पोषन आहार योजनेतंर्गत तांदुळाची वाहतुक आणि धान्यादी मालाचा पुरवठा करण्याबाबत परिच्छेद क्रमांक ड नुसार गट शिक्षण अधिकारी स्तरावर मालाची तपासणी केल्याबाबत दस्ताऐवज लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

10) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक शापोआ-2010/प्र.क्र.18/प्राशि-4 मंत्रालय मुंबई 400032 दिनांक 02/02/2011 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार प्रति लाभार्थी नुसार मर्यादा ठरवुन दिलेल्या आहेत. त्यानुसार गोषवारे काढून पंचायत समितीने देयके सादर केली नाही. करीता शासनाने दिलेल्या मर्यादेत खर्च झाल्याची खात्री करता आली नाही.

11) अनेक शाळांना निकृष्ट दर्जाचा मालाचा पुरवठा केला निकृष्ट माल 5 दिवसाच्या मुदतीत बदली करुन देणे आवश्यक असतांना पुरवठा दाराने तशी कार्यवाही केली नाही. करीता करार नाम्यातील अट क्रमांक 32 नुसार मालाच्या किंमतीच्या 3 टक्के एवढा दंड करणे आवश्यक असतांना विभागाने कार्यवाही न करता कोणतीही तपासणी न करता देयके पारीत केली.

12) शाळेला धान्यादी मालाचा पुरवठा कमी केलेला असतांना पुरवठादाराने जादा मालाचा पुरवठा केल्याबाबत देयके सादर केली. पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर कोणत्याही प्रकारची तपासणी न करता देयके पारीत करण्यात आली. माल प्राप्त नसतांना जादा रक्कम प्रदान केली.

### 3.85 शालेय पोषण आहार धान्यादी माल मागणीपेक्षा कमी/जास्तीने पुरवठा केलेल्या साहित्य रक्कमेची वसुली होणेबाबत.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** सन 2014-2015 मध्ये शिक्षण विभाग, जिल्हा परिषद वाशिम, यांनी शालेय पोषण आहार धान्यादी माल जादा पुरवठा केल्यामुळे रुपये 1,94,636/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती रिसोड व मालेगाव यांचेकडील अभिलेख्यांची तपासणी केली असता पुरवठादाराने मागणीपेक्षा जादा पुरवठा केला आहे. मागणीपेक्षा जादा पुरवठा केलेल्या मालाची रक्कम लेखापरिक्षणात प्रमाणित करता येत नाही. याबाबत जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करुन शासनखाती जमा करण्यात यावी.

2) पंचायत समिती रिसोड यांचे वर्ग 1 ते 5 माहे जुन व जुलै 2014 मागणीपेक्षा जादा पुरवठा केलेल्या मालाची रक्कम 55,370/- वर्ग 6 ते 8 रुपये 17,366/- तसेच पंचायत समिती मालेगाव माहे नोव्हेंबर व डिसेंबर 2014 वर्ग 1 ते 5 मागणीपेक्षा जादा पुरवठा केलेल्या मालाची रक्कम रुपये 62,010/- वर्ग 6 ते 8 रुपये 24,629/- तसेच मालेगाव माहे ऑगस्ट ते ऑक्टोंबर 2014 वर्ग 1 ते 5 रुपये 34,630/- वर्ग 6 ते 8 रुपये 631/- असे एकुण रुपये 1,94,636/- वसुल करुन शासनखाती भरणा करण्यात यावे.

3) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे व दि. महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि. कनमुर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट बॉक्स, मुंबई यांच्याशी केलेल्या दिनांक 11/06/2014 चे करार अट क्रमांक 3 नुसार शाळा निहाय मागणी पुरवठादारास पुरवठा आदेश देवुन करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

**3.86 शाळांसाठी वॉटर फिल्टर खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2014-2015 मध्ये शिक्षण विभाग, जिल्हा परिषद वाशिम, उपकर निधी मधुन राबविलेल्या योजनेवर रुपये 14,98,140/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एव्हरेस्ट इंडस्ट्रिज, गंगापुर, औरंगाबाद यांनी दिनांक 03/03/2015 ला मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना वॉटर फिल्टर त्यांचे कडून खरेदी करण्यात यावे असे पत्र दिले यावरुन पुरवठादाराचे हितसंबंध जोपासुन नियमबाहयपणे पुरवठा आदेश देण्यात आला. मुळ दरकरार लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. किती पुरवठादार होते याची तपासणी करता आली नाही.

2) शिक्षण अधिकारी यांनी जावक क्रमांक 861 दिनांक 24/02/2015 अन्वये गट शिक्षण अधिकारी यांना ज्या शाळेत विदयुत पुरवठा व पाण्याची सुविधा उपलब्ध असेल अशा शाळेची मागणी देण्यात यावी असे नमुद असतांना विदयुत पुरवठा व पाण्याची सुविधा असल्याबाबत कोणतेही दस्ताऐवज न देता मोघम स्वरुपात मागणी करण्यात आली. त्यानुसार पुरवठा देण्यात आला.

3) चाचणी अहवाल प्राप्त झाल्यावर साहित्याचे नमुने शिक्षण अधिकारी यांनी मंजुर करुन पुरवठादारास पाठविल्यानंतर पुरवठा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4) साहित्य खरेदी दिनांक 31/03/2015, चाचणी अहवाल दिनांक 31/03/2015, डिलेव्हरी चलान अन्वये पुरवठा प्राप्त दिनांक 31/03/2015 ला व त्याच दिनांकाला देयक सादर करुन पारीत करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात पंचायत समितीला दिनांक 05/06/2015 ते 07/06/2015 ला पुरवठा प्राप्त झाल्याचे साठा नोंदवही अन्वये निदर्शनास आले याचा अर्थ साहित्य प्राप्त नसतांना पुरवठादाराला रक्कम नियमबाहयपणे अदा करण्यात आली.

5) पुरवठा आदेश व करारनामा अन्वये 5 टक्के सुरक्षा ठेव ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. सुटीचे प्रामणपत्रही लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. करीता रुपये 74,907/- सुरक्षा ठेव व आयकरावरील सरचार्ज रुपये 5,169/- असे एकुण 80,076/- वसुल करावे.

6) मुद्रांक शुल्क अधिनियमान्वये 1958 चे कलम 34 मध्ये सुधारणा केल्याप्रमाणे परिशिष्ट 1 चे अनुच्छेद 63 नुसार रुपये 10 लाखापर्यंत रुपये 100/- व त्यावरील प्रत्येक रुपये 1 लाखाकरीता रुपये 100/- या प्रमाणे रुपये 600/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक असतांना 100/- रुपयावर केला. करीता रुपये 500/- नुकसान झाले सदर रक्कम वसुल करण्यात यावी.

7) डिलेव्हरी चलान अन्वये पुरवठा दिनांक 31/03/2015 ला प्राप्त परंतु प्रत्यक्षात पंचायत समितीला पुरवठा दिनांक 05/06/2015 ते 07/06/2015 ला प्राप्त झाले. करीता दरकरारातील अट क्रमांक 15 अन्वये 7 दिवसात पुरवठा न केल्यास दंड आकारणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. दंडाची वसुली करण्यात यावी.

8) विभागाने मास्टर नोंदवही न ठेवल्यामुळे कोणत्या शाळांकडे वॉटर फिल्टर आहे. व कोणत्या नाहीत. याची माहिती मिळाली नाही. तसेच केंद्रांनी कोणत्या शाळांना वितरण केले याचा तपशिल ठेवण्यात आला नाही. करीता पडताळणी करता आली नाही.

**3.87 जिल्हा परीषद प्राथमिक शाळांकरीता सतरंजी खरेदी खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षात सतरंजी खरेदीवर रक्कम रुपये 19,99,956/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परीषद, यवतमाळ, प्राथमिक शिक्षण विभाग, क्रमांक य.जि.प/शिवि/प्राथ/ भांडार/4133/2014, दिनांक 30/06/2014 अन्वये दिलेल्या पुरवठा आदेशानुसार 30 दिवसात सतरंजीचा पुरवठा करणे आवश्यक असतांना उशिरा पुरविल्याचे निर्दशनास येते. उशिरा सतरंज्या पुरविल्यामुळे प्रति आठवडा 0.5 टक्के आकारणी करुन पुरवठा धारकाच्या देयकातून रक्कम वसुल केली नाही.

2) मागणी मिळाल्यापासुन 6 आठवड्याच्या आत मालाचा पुरवठा केल्यानंतर 90 टक्के रक्कम प्रदान करणे आवश्यक असतांना 100 टक्के रक्कम प्रदान करण्यात आली.

3) दरकराराची मुदतवाढ दिनांक 30/06/2014 ला संपली असतांना दिनांक 30/06/2014 लाच पुरवठा आदेश दिल्याचे निर्दशनास येते.

4) पुरवठा आदेश देण्यापूर्वी पुरवठा धारकाकडुन करारनामा करुन घेणे आवश्यक असतांना पुरवठा आदेश दिल्यानंतर करारनामा क्रमांक यजिप/शिवि/प्राथ/भांडार/4231/2014 यवतमाळ जिल्हा परीषद, यवतमाळ शिक्षण विभाग दिनांक 11/07/2014 नुसार रुपये 1,100/- च्या मुद्रांक स्टॅप पेपरवर केल्याचे निर्दशनास येते.

5) चाचणी अहवाल घेतल्यानंतर 10 टक्के रक्कम अदा करणे आवश्यक असतांना चाचणी अहवाल घेण्यापूर्वी 100 टक्के रक्कम अदा करण्यात आले. चाचणी अहवाल क्रमांक पीसी/टेस्ट/ 427/906/2014-2015, दिनांक 26/08/2014 नुसार घेण्यात आला.

6) अर्धसमास पत्र क्रमांक 01,दिनांक 09/12/2015 अन्वये मागणी करुन सुध्दा पंचायत समिती घाटंजी व्यतिरीक्त इतर पंचायत समितीचे साठा पंजी उपलब्ध केले नाही.

7) पंचायत समिती घाटंजीच्या साठा पंजी व डिलीव्हरी मेमोवर दिनांक नमुद नाही.

8) डिलेव्हरी मेमोवर दिनांक नमुद नाही. मुळ डिलेव्हरी मेमोवर दिनांक नसतांना झेरॉक्स कॉपीवर बनावट तारखा नमुद केल्या आहेत.

**3.88 शिक्षकांचे समायोजन न केल्यामुळे त्यांचे वेतन व भत्यावरील खर्च निरर्थक ठरणे बाबत.**

**जिल्हा परिषद बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई/1093/221/ प्राशि-1 दिनांक 30 जानेवारी 1996 व शिक्षण संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक प्राशिस/पदनिश्चीती/2008/ड-502/4799 दिनांक 16/09/2009 च्या अहवालानुसार पट संख्येच्या आधारे अतिरीक्त ठरत असलेल्या शिक्षकांचे समायोजन हे दिनांक 30 ऑक्टोबर पुर्वि करणे बंधनकारक आहे. या बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 5 दिनांक 08/01/2016 नुसार मागणी करुन वरिल नस्ती उपलब्ध करण्यात आली नाही.

**3.89 शालेय पोषण आहार योजने अंतर्गत धान्यादी किराणा माल पुरवठा देयकाचे प्रदानातील अनियमितते बाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ 2009/प्र.क्र.136/प्राशि-4 दिनांक 18/06/2009 नुसार पोषण आहाराचा दर्जा व गुणवत्ता बाबतचा तपासणी अहवाल प्राप्त न झाल्यामुळे याबाबत लेखापरीक्षणास सत्यता पडताळता आली नाही.

2) जिल्हयातील देयके मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे सदर धान्यादी मालाच्या देयकाची 90% रक्कम मालाची प्रयोग शाळा तपासणी समाधानकारक आल्यावर व जिल्हयातील शालेय पोषण आहाराच्या संदर्भात काही तक्रारी असल्यास उर्वरीत 10% रक्कम शिक्षण संचालक यांचे मान्यतेचे अदा करतील परंतु एकाच वेळेस 100% रकमेचे प्रदान केले आहे.

3) सन 2014-2015 या आर्थीक वर्षात पोषण आहार योजनेतील विविध 90 शाळाना धान्यादी किराणा मालाचा पुरवठा करण्यात आला परंतु एकूण 9 शाळेच्या पोच पावत्यावर दिनांक नाही,त्यामुळे माल विहित मुदतीत प्राप्त झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

**3.90 वाहन नादुरुस्त असतांना वाहन चालक हे पद कार्यरत ठेवणे बाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शिक्षण विभागाचे वाहन क्रमांक जे.ए.0035 च्या लॉग बुक व हिस्ट्री शिट तपासले असता हे वाहन मार्च 2010 पासून नादुरुस्त आहे.परंतू वाहन चालक श्री एस.आर.वाघमारे हे शिक्षण विभागातच कार्यरत आहेत. मागील 5

वर्षापासून वाहन बंद असताना वाहन चालकाची इतर विभागात बदली किंवा समायोजन करणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.91 मुख्याध्यापक / शिक्षकांच्या मंजूर पदसंख्येपेक्षा जादा मुख्याध्यापक व शिक्षक संख्या नेमल्याबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई शासन मान्यता सन 2014-2015 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीनिहाय शिक्षक पदसंख्या वर्ग 1 ते 5 करीता 3,830 व मुख्याध्यापक संख्या 99 अशी पदे मंजूर आहेत. परंतु जिल्हा परिषदेमधे वर्ग 1 ते 5 करिता 4,531 शिक्षक व 256 मुख्याध्यापक कार्यरत आहेत. त्यामुळे वर्ग 1 ते 5 करिता 701 शिक्षक व 157 मुख्याध्यापक जादा नेमले आहेत. मंजूर असलेल्या पदांपेक्षा जास्त शिक्षक व मुख्याध्यापक संख्येमुळे जादाचे वेतन प्रदान होत आहे.

**3.92 शालेय पोषण आहार योजनेतील धान्यादी माल पुरवठयातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शा.पो.आ. 2009/प्रं.क्र.136/प्राशि-4,दिनांक 18/06/2009 नुसार शालेय पोषण आहार योजने अंतर्गत इयत्ता 1 ते 5 या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना 450 उष्मांक व 12 ग्रॅम प्रथिनयुक्त दुपारचे भोजन तसेच इयता 6 ते 8 विद्यार्थ्यांना 700 उष्मांक व 20 ग्रॅम प्रथिनयुक्त दुपारचे भोजन देण्यासाठी 'परिशिष्ट अ' मध्ये निर्देश आहे. याप्रमाणे विद्यार्थ्यांना लाभ मिळाल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांच्या तपासण्या नस्तिबध्द ठेवलेल्या नाही.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शा.पो.आ. 2012/प्र.क्र.484/प्राशि-4,दिनांक 19/06/2013 नुसार वर्ग 6 ते 8 मधील विद्यार्थ्यांना आयर्न गोळ्यांचा पुरवठा करण्यात आलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शा.पो.आ. 2009/प्रक्र136/प्राशि-4 एस.डी.3, दिनांक 14/08/2014 नुसार वर्ग 1 ते 5 मधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाबरोबर सर्व भागात मायक्रो न्युट्रीयंट सप्लिमेंट, आय.एफ.ए., सिरप, बिगर आदिवासी भागात इंटरनल फिड पावडर व आदिवासी भागात मल्टी मायक्रो न्युट्रीयंट फॉरमुलेशन स्प्रिन्कल्स पुरविण्यात आले नाही.

4) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शा.पो.आ. 2004/155/04 प्राशि-4,दिनांक 22/04/2014 नुसार अग्निशामक यंत्रे ठेवण्यात आली नाही.

5) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत माहे नोव्हेंबर-2014 ते मार्च-2015 या कालावधीतील निधीचा वापर कर्मचाऱ्यांचे वेतन प्रदान करण्यासाठी करण्यात आलेला आहे.

6) शालेय पोषण आहार योजनेतील धान्यादी मालाच्या रिकाम्या बारदानांची साठा नोंदवहीत नोंद घेण्यात आलेली नाही. तसेच त्यांची तपासणी करण्यात आल्याचे दिसुन येत नाही.

**3.93 मैदानी खेळणी साहित्य खरेदीतील गंभिर अनियमिततेमुळे जिल्हा परिषद सेस फंडाचे झालेले नुकसान रूपये 13,76,000/-**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खेळणी साहित्य खरेदी करतांना शाळांनी 3 दरपत्रके मागवून कमी दराचे दरपत्रक मंजूर करून साहित्य खरेदी केले आहे. साहित्याची खरेदी रूपये 50,000/- वरील असतांना महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 1093/2635/ उद्योग-6,दिनांक 16/07/1993 नुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागवुन खरेदी करण्यात आली नाही.

2) खरेदी करण्यात आलेले एकाच प्रकारचे साहित्य शाळांना कमी / अधिक दरामध्ये उपलब्ध झाले आहे. एकाच विवरणाच्या खेळणी साहित्याच्या किमतींमध्ये मोठ्या प्रमाणावर फरक असून एकच साहित्य कमी / अधिक

दराने उपलब्ध झाल्याने सर्वात कमी दराच्या साहित्याच्या दरांची तुलना केली असता, कारमेल फायब्रोटेक, नागपूर यांना एकूण रूपये 9,24,500/- चे जादा प्रदान झाले आहे. याचप्रमाणे एकूण 16 शाळांनी इंडीया फायब्रोटेक, नागपूर यांचेकडून अशाच प्रकारची खरेदी केल्याने रूपये 4,23,500/- चे जादा प्रदान झाले आहे. तसेच तीन शाळांनी इक्वालाईट टेक्नॉसेफ यांचेकडुन खरेदी केल्याने रूपये 27,000/- चे जादा प्रदान व 4 शाळांनी चक्रधन इंटरप्रायजेस नागपूर यांचेकडुन खरेदी केल्याने रूपये 1,000/- चे जादा प्रदान झाले आहे. असे एकूण रूपये 13,76,000/- चे एकाच प्रकारचे खेळणी साहित्य खरेदीकरिता वेगवेगळे दर देण्यात आल्याने जादा प्रदान दिसुन येते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक परास/2012/ प्र.क्र.104/वित्त 3,दिनांक 16/10/2012 नुसार खरेदी करावयाच्या साहित्याची गुणवत्ता तपासणी व तांत्रिक तपासणी केल्याचे दिसुन येत नाही. नस्तीला उपलब्ध असलेल्या खेळणी साहित्याच्या फोटोवरून काही ठिकाणी जूनेच खेळणी साहित्य लावल्याचे दिसून येत आहे.

4) केंद्रिय प्राथमिक शाळा, पांचगाव क्रमांक 01, पंचायत समिती मधील नस्तीला शाळेच्या मुख्याध्यापिकेच्या उपलब्ध पत्रावरून खेळणी साहित्य खरेदी करिता जाहिरात निविदा देण्याबाबत पत्र शाळेला प्राप्त होण्यापुर्वीच दिनांक 09/12/2014 ला शाळेच्या आवारात खेळणी साहित्य लावण्यात आले आहे असे दिसून येते.

5) नियोजनबद्ध कार्यक्रम राबविणे आवश्यक होते.

6) अनुदान वितरीत केल्याची नोंद घेणे आवश्यक होते.

7) खरेदी नियमबाहय वाटत असुन पुरवठादारास आर्थिक लाभ देण्याच्या उद्देशाने खरेदी झाल्याचे दिसुन येते.

**3.94 जिल्हा स्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करतांना आढळून आलेली अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3)** - जिल्हा परिषद वर्धा, शिक्षण विभाग सन 2014-2015 मध्ये सेसफंड निधी अंतर्गत जिल्हा क्रीडा व सांस्कृतीक महोत्सव योजनेवर रुपये 8,00,000/- ची तरतुद करण्यात येवून रुपये 7,30,004/- खर्ची घालण्यात आले.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील कलम 4 खालील परीशिष्ट-2 व 3 मध्ये व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.-680/वित्त-9 मंत्रालय मुंबई दिनांक 19/03/2012 अन्वये प्रशासकीय व तांत्रीक मंजुरी वेगवेगळया प्रोफार्मामध्ये न घेता एकाच प्रोफार्मामध्ये घेण्यात आले. श्री. कोकडवार कॅटरर्स, वर्धा यांना करारनामा करण्यापुर्वीच पुरवठा आदेश देण्यात आले. तसेच सदर करारनामावर शिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी नाही. शासन निर्णय, क्रमांक मातस/नस्ती-2002/प्र.क्र.273/39, दिनांक 26/11/2014 अन्वये 3 लक्ष रुपयांचे खर्चाना ई-निवीदा कार्यप्रणाली लागु करणे आवश्यक असताना भोजन व नाश्ता याकरिता ई-निवीदा न मागवीता काम प्रदान केलेले आहे.

2) मंडप व व्हाइट मंडप डेकोरेशन करीता मॉ भवानी बिछायत केंद्र, वर्धा यांना तुलनात्मक तक्त्याचा फायदा न मिळता पुरवठा आदेश देण्यात आला. सदर योजनेच्या खर्चास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत मंजुरी मिळाल्याबाबत जिल्हा परिषद अध्यक्षांची स्वाक्षरी नाही. सदर कार्यक्रमात एकुण कितीजण उपस्थीत होते याबाबत तपशील व कार्यक्रमाकरीता वापरण्यात आलेले साहीत्याचा साठा नोंदवही लेखापरीक्षणास सादर नाही. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, दिनांक 29/07/1989 अन्वेय सदर योजनेचे मुल्यमापन करण्यात आलेले नाही.

**3.95 धान्यासाठी पुरवठा केलेल्या रक्कमेचे नियमबाहय प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2014-2015 मध्ये शालेय पोषण् आहार योजनेअंतर्गत शाळांना धान्य पुरवठा करण्याकरीता महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटीव्ह् मार्केटींग पुरवठाधारकास रुपये 4,62,18,515/- रक्कम प्रदान करण्यात आली.

1) धान्य पुरवठाधारकांनी सब डिलर नेमल्याचे हमीपत्र नाही. धान्य पुरवठा करण्यापुर्वी नेमून दिलेल्या शाळेचा चाचणी अहवाल येण्यापूर्वीच धान्य पुरवठा करण्यात आला व एक महिन्यानंतर चाचणी अहवाल घेण्यात

आला. पुरवठाधारकास प्रथम 90 टक्के रक्कम प्रदान करण्याऐवजी 100 टक्के रक्कम प्रदान करण्यात आली. देयकातुन 5 टक्के वॅट व्हॅट ची रक्कम कपात न करता देयक प्रदान करण्यात आले.

2) धान्यादी पुरवठाधारकाची रक्कम रुपये 83,87,883/- जुन 2015 मध्ये सदर रक्कम खर्च करण्यासंबंधी प्राधिकार नसताना रक्कम प्रदान करण्यात आली. सदर देयकाकरीता सन 2013-2014 मध्ये तरतुद उपलब्ध असतानाही विहित कालावधीत तरतुद खर्ची घालण्यात आलेली नाही.

**3.96 शालेय पोषण आहार योजनेच्या अनुदान वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वर्ग 1 ते 8 करीता सन 2014-2015 मध्ये केंद्र हिस्सा लेखाशीर्ष 22023806 व राज्य हिस्सा लेखाशिर्ष 22023815 अंतर्गत रुपये 3,17,65,000/- तालुकानिहाय शाळेत अन्न शिजविणे, इंधन, भाजीपाला, स्वंयपाकी मदतनीस, मुख्याध्यापक व शिक्षक मानधन, डाटा ऑपरेटर व कार्यालयीन खर्च या बाबीवर तालुकानिहाय अनुदान वाटप करण्यात आले. पंचायत समिती निहाय सदर अनुदानाची पडताळणी व ताळमेळ करुन अखर्चीत रक्कम शासनखाती जमा करण्यात आलेले नाही. पंचायत समितीनिहाय वाटप अनुदानाचे उपयोगीता प्रमाणपत्र नाही.

2) शाळेत अन्न शिजविल्याचा चाचणी अहवाल नाही. अहवालासोबत विदर्याथ्र्याचे उपस्थितीपत्रक जोडलेले नाही. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक- शापोआ-2009/प्र.क्र.207/प्रशि-4, दिनांक 01/06/2009 अन्वये भरारी पथकाने केलेली तपासणी व शाळेची उपस्थितीपत्रक यांची तपासणी केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक 25/03/2014 अन्वये स्वतंत्र पथकामार्फत कैंद्रिय स्वंयपाकगृहातील अन्नाचे तपासणी अहवाल नाहीत. अर्धसमास पत्र क्रमांक 5 दिनांक 10/12/2015 अन्वये शालेय पोषण आहार योजनेचे मासिक प्रगती अहवाल व वार्षिक फलनिष्पत्ती अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, शासन निर्णय, क्रमांक- शा.पो.आ./2009/प्र.क्र.383/प्रशि-4, दिनांक 26/02/2010 अन्वये अन्न शिजवुन देणा-या व्यक्तीने सक्षम वैद्यकीय अधिका-याकडुन आरोग्यविषयक तपासणी केल्याचा अहवाल नाही. ग्राम शिक्षण समितीने शाळेमध्ये उपलब्ध होणारे अन्नधान्या पासुन विद्यार्थ्यांना आहार देण्याची व्यवस्था केलेली नाही. महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक 26/02/2010 तील मुददा क्रमांक 2 नुसार धान्य पुरवठाधारकाने शाळेना पुरवठा केलेला माल योग्य दर्जाचा व वजनाचा असल्याबाबतचा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सादर केलेला नाही.

5) केंद्र शासन परिपत्रक दिनांक 06/03/2010 अन्वये प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना प्रतीदिन 450 उष्मांक व 12 ग्रॅम प्रथिने व उच्च वर्गातील विद्यार्थ्याकरीता 700 उष्मांक व 20 ग्रॅम प्रथिने पुरविल्याचे दिसुन येत नाही.

6) सदर योजनेचा मुळ उद्देश शाळेतील विद्यार्थ्याची उपस्थिती वाढवीणे असुन सदर योजनेचा मुळ उद्देश सफल झाल्याबाबत दस्तऐवज आढळुन आले नाही.

**3.97 झेरॉक्स वरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** शिक्षण विभागाव्दारे झेरॉक्सवर रक्कम रुपये 19,174/- खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गजानन झेरॉक्स ॲन्ड प्रिंटर्स, भंडारा यांचे बील क्रमांक 469, हे दिनांक 08/08/2014 चे असुन बील क्रमांक 467, हे दिनांक 11/08/2014 चे नमुद आहे. बील क्रमांक 469 हे दिनांक 11/08/2014 च्या नंतरच्या तारखेचे असावयास पाहिजे म्हणजेच बील क्रमांक 469 हे बनावट वाटते.

2) जय मल्हार झेरॉक्स यांचे बील क्रमांक 1474 दिनांक 03/07/2014 - 209 प्रती झेरॉक्स नोंदवहीत दिनांक 03/07/2014 ला फक्त 50 प्रतींची नोंद आहे. म्हणजेच 159 जादा प्रतींवरील खर्च आहे.

3) बील क्रमांक 1499, दिनांक 27/10/2014 यात झेरॉक्स प्रती काढल्याचा कालावधी 02/09/2014 ते 30/09/2014 असुन बील क्रमांक 1513, दिनांक 12/11/2014 यात झेरॉक्स प्रती काढल्याचा कालावधी पुन्हा 02/09/2014 ते 30/09/2014 नमुद आहे. म्हणजेच बील क्रमांक 1513, ची रक्कम जास्तीची आहे.

4) बील क्रमांक 1489, यात कालावधी 01/08/2014 ते 28/08/2014 असुन 227 प्रती दाखविल्या आहेत. प्रत्यक्षात झेरॉक्स नोंदवहीत कालावधी फक्त 01/08/2014 ते 06/08/2014 पर्यंत असुन एकुण 88 प्रती काढल्याचे नमुद आहे.

**3.98 शालेय पोषण आहार योजना, राज्य हिस्सा, प्राप्त तरतुद व खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 27) -** शिल्लक अनुदान शासनास परत न करणे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शालेय पोषण आहार योजना अंतर्गत वर्ग 1 ते 4 व 6 ते 8 च्या विदयार्थ्यांसाठी इंधन व भाजीपाला, धान्यादी माल, स्वयंपाकी मदतनीस व एलपीजी करीता सन 2013-2014 चे अनुदान मोठया प्रमाणावर शिल्लक असतांना पुन्हा सन 2014-2015 अखेर प्राप्त अनुदानातुन वाटप केलेले अनुदान वजा जादा रुपये 74,06,019/- एवढे अनुदान शिल्लक असुन ते शासनास परत करण्यात आले नाही.

**3.99 शालेय पोषण आहार योजने अंतर्गत धान्यादी माल पुरवठा मधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7)** - सन 2014-2015 या आर्थिक वर्षाअंतर्गत शालेय पोषण आहार योजनेसाठी धान्यादीमाल पुरवठयावर रुपये 9,06,08,277/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राथमिक शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/ सुधायो/ प्राशीस/ 307/ 2014-2015/ 3288, दिनांक 11/06/2014 चे अनुषंगाने सुचना क्रमांक 3 अनुसार पुरवठा आदेशापूर्वी धान्यादीमालाची शाळानिहाय मागणी पुरवठादारास 20 दिवस आधी देणे आवश्यक आहे. तसेच दिनांक 26/02/2010 चे परिपत्रकातील (अ-8) (क-2) (क-3) (क-6) नूसार करारनामा जुन 2014, अट क्रमांक 7 नुसार शालेय पोषण आहार विभागाकडून कोणत्याही मालाचे सन 2014-15 या वित्तीय वर्षात मागणी पत्रके पुरवठा आदेशापुर्वी प्राप्त केलेले नाही. त्यामुळे पुरवठयावर खर्च केलेली रक्कम रुपये 9,06,08,277/- मान्य करता येणार नाही.

2) नियमानुसार पूरवठा आदेशानंतर 20 शालेय कामाकाज दिवसाचे आत मालाचा पुरवठा झालेला नसुन याबाबत विलंब शुल्काची दंडात्मक रक्कम रुपये 96,693/- कपात केलेली नाही.

3) धान्यादिमालाचे सुरुवातीचे देयकातून प्रथम 90 टक्के रक्कम व प्रयोगशाळेचा अहवाल समाधानकारक असल्यानंतरच 10 टक्के अदा करावी असे असतांना पूर्ण रक्कम अदा केल्याने परिपत्रक्रातील सुचना क्रमांक 7 चे पालन झालेले नाही.

4) धान्यादीमाल पुरवठा खर्चाचे तालूकानिहाय खर्चाचे अहवाल प्राप्त केलेले नाहीत.

**3.100 जिल्हा परिषद शाळांना संगणक संच पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** जिल्हा परिषद शिक्षण विभागाअंतर्गत जिल्हा परिषद शाळांना एकूण 52 संगणकाची खरेदी करण्यात आलेली असुन रक्कम रुपये 19,96,023/- चा खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद शाळांना संगणक पुरविण्याची योजना जिल्हा निधीतून राबविण्यासाठी भारत सरकार, न्यु दिल्ली कंपनीचे संगणक खरेदीचा पुरवठा आदेश वैष्णवी कॉम्पयुटर, चंद्रपूर यांना देवुन 52 संगणकाची प्रती संगणक संच रुपये 38,000/- इतके दर निश्चित करुन खरेदी करण्यात आलेली आहे. परंतु दरकाराराचा कालावधी पाहता संगणक खरेदीचा कालावधी संपुष्टात आल्याचे दिसते. तसेच, नस्ती पान क्रमांक 3 वर कालावधी संपुष्टात आल्याचा

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शेरा सुद्धा नोंदविलेला आहे. दरकरार अनुक्रमांक 2 नुसार सदर प्रती संचाची किंमत रुपये 36,557/- दरकरारात नमुद करण्यात आली असतांना, तसेच पुरवठा आदेशात दिनांकाला सुध्दा अनुक्रमांक 2 मध्ये प्रती संच रुपये 36,557.20/- निश्चित दरापेक्षा जादा दराने खरेदी करुन प्रति संच रुपये 1,827.86/- एकुण 52 संगणक संचाकरीता रुपये 95,048.72/- चे जादा शोधन करण्यात आलेले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी दरकराराचा कालावधी संपुष्टात आल्याचे निदर्शनास आणुन दिल्यानंतरसुध्दा सदर बाबीकडे दुर्लक्ष करुन दरकरारापेक्षा जास्त दराने खरेदी केलेली आहे. दरकरार अनुक्रमांक 1 व 2 मध्ये दर्शविलेल्या किंमतीपेक्षा पुढील कालावधीच्या दरकरारात पुनश्च किंमतीत कमी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि उपरोक्त अनियमितता पाहता पुरवठादारास रुपये 95,048.72/- चे जादा प्रदान झाल्याने स्पष्ट होते. यावरुन संगणक साहीत्य खरेदीच्या प्रक्रियेत फार मोठया प्रमाणात अनियमितता झालेली आहे. जादा प्रदान केलेल्या रकमेची वसुली होणे आवश्यक आहे.

2) टिप्पणी क्रमांक 2 वर वित्त विभागाने आपले अभिप्राय नोंदवून Acer व Lenevo या दोन कंपनीपैकी Acer कंपनीच्या संगणक संचाची खरेदी तांत्रिक बाबी विनिर्दीष्ठ न करता कशाच्या आधारे निर्देश दिले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.101 जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना पि.टी.बॅड संच पुरविणे बाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती कुरखेडा क्षेत्रातील जिल्हा परिषद (प्राथमिक) शाळांना पि.टी.बँड संच पुरविणे यावर प्रमाणक क्रमांक 1001, दिनांक 28/01/2015 नुसार एकुण रुपये 49,275/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली, यांनी पत्र क्रमांक 377 दिनांक 08/02/2015 अन्वये उपशिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना पंचायत समितीस प्राप्त साहित्याचे दर्जा समाधानकारक असल्याबाबत तपासणी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार तपासणी अहवाल सादर केल्याचे आढळुन आले नाही.

2) साहित्याचे साठा नोंद रजिस्टर ची सत्य प्रत नस्तीस उपलब्ध नाही.

3) संबंधित शाळा प्रमुखाकडुन गटशिक्षण अधिकारी यांचे मार्फत उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

4) देयकाची रक्कम प्राप्त झाल्याबाबत साहित्य पुरवठादाराकडुन पावती घेण्यात आलेली नाही.

**3.102 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वर्ग 01 ते 04 मध्ये शिकणा-या दारिद्र्य रेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वर्ग 01 ते 04 मध्ये शिकणा-या दारिद्र्य रेषेखालील मुलींना उपिस्थिती भत्ता वाटप यावर एकुण रक्कम रुपये 40,96,200/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, निर्णय क्रमांक पि.आर.ई. 1091(414)/प्रा.शि, दिनांक 10/01/1992 नुसार ग्रामीण भागातील मुलींची शाळेतील उपस्थिती संख्या वाढविण्याच्या दृष्टिने प्रत्येक महिन्यात वर्गात 75 टक्के उपस्थिती असणाऱ्या दारिद्रय रेषेखालील मुलींना प्रतिदिन रूपये 01/- प्रमाणे वाटप करण्यात आलेले आहे. पंचायत समितीने केंद्रनिहाय प्रत्येक शाळांना उपस्थितीभत्ता रक्कम वितरीत केल्याबाबतचे खर्च अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

2) विद्यार्थिनींना उपस्थिती भत्त्याची रक्कम ग्रामशिक्षण समितीच्या सभेत देण्यात यावी व वाटपपत्रावर उपस्थित अध्यक्ष, सदस्य यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात याव्यात. असे निर्देश तरतुद वाटप आदेशान्वये दिलेले असतांना त्याप्रमाणे पंचायत समितीकडुन अहवाल प्राप्त केल्याचे आढळून आले नाही.

3) शिक्षण विस्तार अधिकारी यांनी 100 टक्के, गट शिक्षण अधिकारी यांनी 50 टक्के व गट विकास अधिकारी यांनी 10 टक्के पालकांना भेट देऊन प्रत्यक्ष उपस्थिती भत्ता प्राप्त झाल्याबाबतचे प्रमाणपत्र शिक्षण विभागास सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

4) विद्यार्थिनींचे पालकाचे नाव दारिद्र रेषेखालील कुटूंबाचे यादीत असल्याबाबत संबंधीत ग्रामसेवक अथवा तलाठी यांचे प्रमाणपत्र आढळले नाही.

**3.103 लेखन पाटीची खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** लेखन पाटीची खरेदीवर रक्कम रूपये 15,12,583/- एवढा खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या भागातील प्राथमिक शाळेतील अनु1 जमातीच्या इयत्ता/जाती. असतांना तालुकानिहाय थी मधिल विद्यार्थ्यांसाठी राबवावयाची 4 ली ते अनुविमुक्त भटक्या जमाती /जमाती/जाती. व इतर संवर्गातील विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊनसरसकट विद्यार्थ्यांसाठी राबविली आहे.

2) दर करारातील अटी/शर्तीनुसार पुरवठा आदेश दिल्यापासून 06 आठवड्यात लेखन पाटीचा पुरवठा करावयाचा आहे. उशिराने पुरवठा केल्यास पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीच्या 0.5 टक्के दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. गट शिक्षणाधिकारी सोयगांव यांना दिनांक 09/06/2012 रोजी लेखन पाटीचा (7250 नग @ रुपये 21.60) पुरवठा केल्यामुळे रुपये 7,830/- दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे.

3) गट शिक्षणाधिकारी यांच्या लेखन पाटी पोहोच व उपयोगिता प्रमाणपत्राची तपासणी केली असता सोयगाव व कन्नडच्या पोहोच पावतीवर संख्या/नग नमूद नाही.

**3.104 जिल्हा आयकर व व्यवसाय कराच्या रकमा थेट शासन खाती भरणा न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे आहेत.

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद औरंगाबादचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाचे वेळी असे निदर्शनास आले की, माहे फेब्रुवारी 2015 वेतनातून कर्मचाऱ्यांचा आयकरापोटी रक्कम रुपये 97,230/- व व्यवसायकरापोटी रक्कम रुपये 20,400/- कपात करुन अनुक्रमे धनादेश क्रमांक 64811 व 64812, दिनांक 27/03/2015 अन्वये मे.आर.डी.खिंवसरा & असो. यांनी (सनदी लेखापाल) यांना प्रदान करण्यात आले आहेत. सदरील रक्कमा मे.आर.डी.खिंवसरा & असो. यांनी दिनांक 23/04/2015 रोजी संबंधित शासन लेखाशिर्षात भरणा केल्या आहेत.

आयकर व व्यवसायकराच्या रकमा सनदी लेखापाल यांना प्रदान करण्याच्या अथवा त्यांच्या मार्फत शासन खाती भरण्याचे शासनाचे कोणतेही निर्देश नाहीत. कर्मचाऱ्यांच्या वेतनातुन कपात करण्यात आलेल्या सदर रकमा थेट शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. एक महिना विलंबाने सदर रकमा शासन खाती भरणा केल्या आहेत. सदर बाब अतिशय गंभीर असून या बाबत विभागाने भविष्यात दक्षता घेणे आवश्यक आहे.

**3.105 आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलींना शाळेत येण्यासाठी उपस्थिती भत्ता अनुदान अखर्चित असलेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शिक्षण विभाग जिल्हा परिषद औरंगाबादचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाचे वेळी लेखा विभागाने सादर केलेल्या विनियोजन लेख्याचे अवलोकन केले असता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलींना शाळेत येण्यासाठी उपस्थिती भत्ता अनुदान दिनांक 31/3/2015 रोजी रक्कम रुपये 55,36,289/- खालील तपशिलाप्रमाणे अखर्चित असल्याचे निदर्शनास आले.

उपरोक्त तपशिलानुसार प्राप्त अनुदान रुपये 67.70 लक्ष पैकी फक्त रुपये 12.33 लक्ष खर्च केल्याचे दिसून येते. रुपये 12.33 लक्ष पैकी रुपये 9.24 लक्ष अनुदान सन 2013-2014 चे असल्याचे निदर्शनास आले. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलींना शाळेत येण्यासाठी उपस्थिती भत्ता वाटप करणे व सदर घटकातील मुलींना शाळेत येण्यासाठी प्रोत्साहन देण्यासंबंधी शिक्षण विभाग उदासीन असल्याचे दिसून येते.

**3.106 इंटरअॅक्टीव्ह ई क्लास युनिट खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर खरेदिवर रक्कम रुपये 29,28,000/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टिपणी पान क्रमांक 5, दिनांक 06/09/2014 रोजी महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर निविदा 04/09/2014 ते 11/9/2014 या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दी दिली परंतू वृत्तपत्रात जाहीरात पसिध्दीस दिली नाही.

2) दिनांक 12/09/2014 रोजी ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या प्रमाणे 5 निविदा प्राप्त झाल्या परंतू निविदिधारकांनी शासन निर्णय दिनांक 15/07/2014 नुसार इसारा रक्कम व इतर कागदपत्रे न जोडल्यामुळे तीन निविदा स्पर्धेतून बाद झाल्या व निविदा समितीने फेर निविदा बोलविण्याचे ठरविले व दिनांक 27/11/14 रोजी फेर निविदा प्रसिध्दीस देण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांनी मान्यता दिली व दिनांक 17/12/2014 रोजी निविदा प्रसिध्द केली. दिनांक 29/12/2014 पर्यंत एकही निविदा तांत्रिक अडचणीमूळे आली नाही. त्यामूळे दिनांक 29/12/2014 ते 02/01/2015 पर्यंत अन्वये मुद्दत वाढ देण्यात आली. याबाबतचे संदर्भिय अभिलेखे संचिकेत दिसून आले नाही.

3) दिनांक 22/01/2015 रोजी ऑनलाईल पध्दतीने मागविलेली निविदा दुपारी 12.45 वा उघडयात आली. प्रमोद एन्टरप्राईजेस यांना 20 संचाचे पुरवठा आदेश देण्यात आले आहे. परंतू या बाबत संचिकेमध्ये चिंतामणी डयुटेक यांचा दिनांक 04.11.2014 रोजीचा तक्रार केली. त्याअनूषंगाने कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक 123,दिनांक 16/12/2014 अन्वये त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना उपरोक्त तक्रार अर्जाबाबत विचारणा केली याबाबत सादर टिपणीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी केलेली नाही. म्हणजेच तक्रारीचे निराकरण झाल्याचे दिसून येत नाही.

4) जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश अट क्रमांक 8,9,10 नुसार कार्यवाही झालेली नाही.

5) अट क्रमांक 16 अन्वये त्रैमासिक ताळमेळ महालेखापाल यांचेशी घेतलेला नाही.

6) 20 जिल्हा परिषद प्रशाला यांना 20 संच व कस्तूरबा गांधी बालीका विद्यालय यांना चार संच वाटप केले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 90 (1) नुसार नमुना नंबर 32 जडसंग्रह नोंदवही मध्ये नोंदी घेतलेल्या नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक जिल्हा परिषदने पाळले नाही.

8) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक सर्कीण 1000/-प्र.क्र.-14 कोष-4, दिनांक 11/02/2011 अन्वये 15 फेबुरवारी नंतर यंत्रसामुग्री, फर्निचर, स्टील फर्निचर इत्यादी खरेदी करून नये असे आदेश असतांना उपरोक्त खरेदी कलेी आहे.

9) संबंधित शाळेकडून उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले इंटर अॅक्टीव्ह इ क्लॉस युनिट वापराबाबतचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

**3.107 माध्यामिक शाळेस व उच्च प्राथाकि शाळेससाठी डयुलेक्स संच खरेदी बाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** शिक्षण विभाग जिल्हा परिषद जालना यांनी सन 2014-15 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद उपकरातून रक्कम रुपये 9,94,080/- माध्यमिक व उच्च शाळांना डयुलेक्स संच खरेदी केले आहे व वाटप करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 22/12/2014 रोजी डयुलेक्स संच खरेदीसाठी टिपणी सादर करण्यात आली परंतू दिनांक 31/12/2014 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी शाळेची मागणी विद्यार्थी संख्या उपलब्ध करून मगच प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे बाबत नमुद केले मागणी नसतांना केवल तरतूद करण्यात आल्याने दायित्व निर्माण करणे हि बाब वित्तीय प्रशासनाच्या मानंकनाचे उल्लंघन करणारी आहे.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संर्कीण 1000/प्र.क्र.14/कोष-14, दिनांक 11/02/2011 अन्वये 15 फेब्रुवारी नंतर यंत्रसामुग्री फर्निचर स्टील फर्निचर खरेदी करून असे असतांना उपरोक्त खरेदी केली आहे.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग व उर्जा विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-1088/(2512) उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परि.क्र.814 व परिशिष्ट क्र.8 नुसार साहित्याची तपासणी मान्याता संस्थेकडुन अथवा शासकीय तंत्रनिकेतन संस्थेकडुन करून घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 90(1) नुसार नमुना नबर 32 जडसंग्रह नोंदवही मध्ये साहित्याची नोंद घेणे आवश्यक परंतू पंचायत समिती शिक्षण विभाग व शाळेची जडसंग्रह नोंदवही अर्धसमासपत्र क्रमांक 5, दिनांक 25.08.2016 देवूनही लेखापरीक्षणात उपलब्ध केले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडीपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळपत्रक जिल्हा परिषरदेने पाळलेला नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 83 (3) नुसार विभागाने बारकाईने वस्तुचा दर्जा व गुणवत्ता तपासून पाहणे आवश्यक आहे. वस्तू गटस्तरावर पोहच असल्याने त्यांनी वस्तूंची तपासणी व वाटप कोणास केले याबाबतची खात्री केलली नाही.

7) माहे मार्च 2015 मध्ये जिल्हयातील सर्व प.स. गटशिक्षण अधिका-याकडून शाळेची डयुलेक्सची मागणी मागविली होती मागणी केलेल्या संख्या 21790 एवढी असतांना कोणत्या शाळेस किती नग वाटप करावयाचे आहे याचे निश्चित धोरण व निकष शिक्षण विभागाने आखलेले दिसून येत नाही.

**3.108 शिक्षणधिकारी (माध्यमिक) यांचेकडील डयुल डेस्क खरेदी बाबतचे आभिलेखे न दर्शविणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** शिक्षण विभाग जिल्हा परिष्द जालना यांचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणात शिक्षणाधिकारी (माध्यामिक) यांचेकडील रक्कम रुपये 15,65,120/- खरेदी बाबतचे अभिलेखे व संदर्भिय संचिका लेखा परिक्षणात अर्धसमास पत्र क्रमांक 5, दिनांक 25/08/2016 अन्वये मागणी करूनही उपलब्ध केले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्मांक एसडी-1089/1515/सीआर-5711/29, दिनांक 13/02/1990 नुसार लेखापरीक्षणासाठी आवश्यक ते अभिलेखे नोंदवहया उपलब्ध करून देणे व लेखापरीक्षणाचा हेतू साध्य करण्यात मदत करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही शिक्षण विभागाने केली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक लेखाप-2013 (7/13) वित्त-8, दिनांक 19/02/2013 अन्वये व मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम 1930 चे सुधारणा अधिनियम 2011 चे कलम 8 अन्वये दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे. या संदर्भांत स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय जालना यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना पत्र जावक क्रमांक 441, दिनांक 03/03/2017 नुसार दंडात्मक कार्यवाहीचा प्रस्ताव सादर केला आहे.

**3.109 निमशिक्षकांना वाढीव मानधनापोटी झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी निमशिक्षकांना वाढीव मानधनापोटी रुपये 4,20,02,500/- इतके वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व शिक्षा अभियान कक्ष) जिल्हा परिषद यांचे आदेश क्रमांक प्रनिप/प्राथ/सशिअ/नियुक्ती/निमशिक्षक/2014 दिनांक 30/07/2013 अन्वये कंत्राटी तत्वावर निमशिक्षक म्हणुन नियुक्ती देवुन रुपये 3,500/- प्रमाणे मानधन देण्याबाबत आदेशित केले होते. सदरची नियुक्ती दिनांक 01/06/2013 ते 31/03/2014 या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात होती.

2) उपरोक्त कंत्राटी तत्वावरील निमशिक्षकांना जिल्हा परिषद बीड (शिक्षण विभाग) यांचे आदेश क्र.प्रावि/अ/कावी/1423/2014/बीड दिनांक 17 मे 2014 अन्वये प्रशिक्षीत प्राथमिक शिक्षकांची वेतनश्रेणी रुपये 5200-20200 ग्रेड पे 2800/- मध्ये समायोजनाने पदस्थापना देण्यात आली. सदरची नियुक्ती दिनांक 14/06/2014 पासुन बंधनकारक करण्यात येवुन सदरच्या आदेशातील अट क्रमांक 5 अन्वये निमशिक्षक म्हणुन केलेल्या सेवा कालावधीचे कोणतेही आर्थिक लाभ अथवा थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही असे स्पष्ट केले होते.

3) जिल्हा परिषद, बीड (सर्व शिक्षा अभियान कक्ष) जाक्र./सशिअ/कावी/आस्था/2013-14 /1220 दिनांक 21/03/2014 अन्वये कंत्राटी तत्वावर नियुक्त निमशिक्षक व उच्चीकरण झालेल्या शाळेवरील शिक्षकांच्या वेतनासाठी मानधन फरक म्हणुन रुपये 4,20,02,500/- जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधीमध्ये वर्ग करण्यात आले.

4) शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र क्रमांक 1220 दिनांक 21/03/2014 अन्वये सदरची रक्कम रुपये 4,20,02,500/- सर्व पंचायत समितीस वितरीत करुन जुन 2013 ते मार्च 2014 या कालावधीकरीता प्रत्येकी रुपये 13,250/- प्रमाणे 10 महिन्याचे फरक देण्याबाबत सुचित करुन संबंधितास रक्कमा प्रदान केल्या, तथापि याबाबत कुठलेही आदेश नव्हते किंवा सदरचा फरक देखील देय नव्हता.

5) सदरचा निधी मार्च अखेर प्राप्त झाल्याने पुढील वर्षात खर्च करण्याची परवानगी शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र क्रमांक 5908 दिनांक 20 जुन 2014 अन्वये देवुन सदरच्या रकमा माहे 8/2015 मध्ये प्रदान केल्या आहेत.

6) सन 2015-2016 साठी याच उद्देशाने रक्कम रुपये 5,17,92,000/- सर्व पंचायत समित्यांना वितरीत करण्यात आले होते, परंतु सदरची रक्कम नजर चुकीने वितरीत झाली असल्याचे नमुद करुन वाढीव वित्तप्रेषण परत करणेबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचे पत्र क्रमांक 2015/वित्त/रोखकिर्द /कावि 612 दिनांक 09/04/2015 अन्वये सर्व गटविकास अधिकारी यांना सुचित केल्याचे दिसते परंतु सदरची रक्कम गटविकास अधिकारी यांनी परत केलेबाबत व जिल्हा निधीत रक्कम वर्ग केल्याबाबतचा तपशिल लेखापरिक्षणास उपलब्ध केलेला नाही.

7) मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम 53 वे परिशिष्ट 20 चे नियम 1 नुसार शासकिय निधीचा विनीयोग वित्तीय औचित्याला धरुन झाला पाहिजे. पंरतु असे झालेले दिसत नाही. शासन निधी वर्ग करताना निधीचे समायोजन करावयाचे किंवा वितरीत करावयाचे याबाबत काळजी घेणे आवश्यक होते. वितरीत केलेला शासन निधी संबंधिताकडून वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.110 मागणी पेक्षा जादा केलेल्या जादा पुरवठयाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी शालेय पोषण आहारावर सन 2014-2015 मध्ये रुपये 1,66,64,239/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती निहाय मागणी व प्रत्यक्ष पुरवठा याची तपासणी केली असता मागणी पेक्षा जादा पुरवठा करुन देयक पारित केल्याचे दिसुन येते. करारनामा अटी व शर्तिच्या अट क्रमांक 7 नुसार मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेची मागणी घेवून पुरवठा करणे आवश्यक आहे.

2) प्राथमिक शिक्षण संचालक पुणे यांचे परिपत्रक क्रमांक - शापोआ/सुधायो/प्राशिसं/307/ 2014-15/3288 दिनांक 11/06/2014 नुसार महाराष्ट्र स्टेट को.आप. कंन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांच्याशी दर करार करण्यात आला आहे. त्यानुसार पुरवठा केलेल्या धान्यादी मालाची 90% रक्कम प्रयोग शाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक असल्यानंतरच अदा करावीत व पुरवठा संदर्भात काही तक्रार असल्यास 10% रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने अदा करावी. परंतु धान्यादी मालाच्या पुरवठा देयकाची 100% रक्कम एकाच वेळी प्रदान केलेली आहे.

3) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक - शापोआ 2010/प्र.क्र.18/प्राशि 4 दिनांक 02/02/2011 चे परिशिष्ट अ नुसार शालेय पोषण आहार योजने अतंर्गत द्यावयाचा पाक कृतीचा तपशिल नमुद

केलेला असुन त्यात गोड भात देण्याचे नमुद केलेला आहे. परंतु साखर अथवा गुळ पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले नाहीत. तसेच कोणत्याच शाळेने मागणी केलेली नाहीत. उरोक्त शासन निर्णयानुसार आठवडयातील प्रत्यके दिवसासाठी त्या त्या जिल्हयातील आवश्यकतेनुसार योग्य त्या पाक कृतीची निवड जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समिती मार्फत करण्यात येईल.

4) पंचायत समिती पाटोदा यांनी माहे आक्टोबर व नोव्हेबर 2014 रोजीची शालेय पोषण आहारची मागणी हरभरा या धान्यादी मालाची केली असतांना त्यांना वाटाणा पुरवठा केलेला आहे.

5) प्राथमिक शिक्षण संचालक पुणे यांचे परिपत्रक क्रमांक - शापोआ/सुधायो /प्राशिसं /307/ 2014-15/ 3288 दिनांक 11/6/2014 नुसार धान्यादी मालाचे देयके अदा करण्याच्या पध्दतीत - 6 नुसार पुरवठादाराने पुरवठा केलेल्या धान्यादी मालाची देयक चार प्रतीत बनवुन सादर करतील, परंतु सदर देयकाचे प्रती लेखापरिक्षणास उपलब्ध् केल्या नाहीत.

6) पुरवठा अटी व शर्तिनुसार अट क्रमांक 22 अन्वये पुरवठादार त्यांनी पुरवठा केलेल्या तांदुळ व धान्यादी मालाच्या पुरवठयाचा अहवाल दरमहा 5 तारखेपर्यत गटशिक्षणाधिकारी/ अधिक्षक यांना सादर करणे आवश्यक आहे. सदरचे अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) काही निवडक देयकांची तपासणी केली असता एकूण व प्रत्यक्ष पुरवठाची तपासणी केली असता एकूण मागणीपेक्षा रक्कम रुपये 8,38,227/- चा पुरवठा जादा केला आहे. वर्षातील इतर देयकात असा जादा पुरवठा केला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.111 सर्व साधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ग्रीन बोर्ड खरेदीतील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणी च्या सन 2014-15 च्या लेखा परीक्षणा दरम्यान ग्रीन बोर्ड रक्कम रुपये 10,80,000/- खरेदी मध्ये अनियमितता आढळून आल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी तथा सचिव, जिल्हा नियोजन समिती, परभणी यांचे निधी पुरवठा आदेश क्रमांक जिनिस/जिवायो/13-14/1076,दिनांक 04/07/2013 मधिल अट क्रमांक 2 नुसार सदर निधी खर्च त्याच वित्तीय वर्षात म्हणजे सन 2013-14 मध्ये होणे आवश्यक होते. मात्र हा खर्च पुढील वित्तीय वर्षामध्ये झालेला दिसून येतो.

2) खरेदीची टिप्पणीमध्ये खरेदी करावयाचे 417 ग्रीन बोर्ड कोणत्या शाळेसाठी द्यावयाचे आहेत याबाबत उल्लेख नाही. जिल्हा परिषदेच्या शाळेत यापूर्वी दिलेले ग्रीन / ब्लक बोर्ड कधी दिले, अथवा ते व्यवस्थित आहेत का खराब झाले आहेत याचा टिप्पणीत उल्लेख नाही किंवा शाळेकडून ग्रीन बोर्ड मागणी असले बाबत संचिकेत अभिलेखे उपलब्ध नाही त्यामुळे 417 ग्रीन बोर्डची आवश्यकता आहे याबाबत काय निकष लावले याचा बोध होत नाही.

3) पुरवठा आदेशां प्रमाणे सर्व 9 पंचायत समिती निहाय 417 ग्रीन बोर्ड वाटप केले आहे. मात्र पंचायत समितीचे साठा नोंदवही दर्शविण्यात आले नाही.

4) पंचायत समिती स्तरावरून सदर ग्रीन बोर्ड शाळेला पुरवठा झाले तरी संबधित शाळेचे साठ नोंद वही लेखा परीक्षणास दर्शविण्यात आली नाही, तसेच संबधित शाळांचे जुन्या बोर्डाची काय विल्हेवाट लावली याबाबत अभिलेखे दर्शवले नाहीत

5) सदर ग्रीन बोर्ड ची गुणवत्ता तपासणी मान्यताप्राप्त संस्थेकडून करून घेतली नाही.

6) जिल्हाधिकारी, परभणी यांचे दिनांक 04/07/2013 चे पत्रामधील अट क्रमांक 8 नुसार सदर योजनेचा खर्चाबाबत हिशेब स्वतंत्र ठेवला नाही व प्रगती अहवाल दर महिन्याच्या 5 तारखे पर्यंत जिल्हाधिकारी, परभणी यांना पाठविल्याचे अभिलेखे संचिकेत उपलब्ध नाही.

**3.112 मानव विकास कार्यक्रम अंतर्गत गरजू मुलींना सायकल पुरवणे या योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणी च्या सन 2014-15 च्या लेखा परीक्षणा दरम्यान मानव विकास कार्यक्रम अंतर्गत गरजू मुलींना सायकल पुरवणे या योजनेमध्ये अनियमितता आढळून आल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेतील निधी सन 2013-14 मधिल मंजूर निधी असल्याने प्रशासकीय मान्यता नुसार सदरचा खर्च त्याच वर्षात म्हणजे सन 2013-14 मध्ये होणे आवश्यक होते तसेच प्रशासकीय मान्यतेच्या अट क्रमांक 13 प्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र त्याच आर्थिक वर्षात सादर करणे आवश्यक होते. मात्र असे करण्यात आले नाही.

2) प्रशासकीय मान्यता मधिल अट क्रमांक 02 नुसार तांत्रिक मान्यता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची असावी परंतु, तांत्रिक मान्यता आदेशाची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

3) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक माविका-2012/प्र.क्र.69/का.1418,दिनांक 20/07/2012 नुसार इयत्ता 8 वी ते 12 वी पर्यंत शिक्षण घेत असलेली व शाळेपासून 5 किलोमीटर अंतरापर्यंत गरजू मुलींना सदर योजनेचा लाभ देणे अपेक्षित असताना एकूण 11 लाभार्थी यांचे गाव शाळेपासून 5 किलोमीटर पेक्षा जास्त असताना सुद्धा त्यांना लाभ देण्यात आला आहे. सदर 11 लाभार्थी कडून प्रत्येकी रुपये 3,000/- असे एकूण रुपये 33,000/- वसूल करणे आवश्यक आहे. तसेच पंचायत समिती, मानवत, सेलू, जिंतूर, पूर्णा, पाथरी, सोनपेठ, गंगाखेड, परभणी अंतर्गत लाभार्थींच्या गावच्या अंतराबाबत संचिकेत माहिती उपलब्ध नसल्याने अभिप्राय देता आले नाही.

4) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक माविका-2012/ प्र.क्र.99/का.1418,दिनांक 03/12/2013 च्या सूचना क्रमांक 6 नुसार लाभार्थी विद्यार्थिनीसाठी सायकली खरेदी करताना ISI मार्क नामांकित उत्पादनाच्या दर्जेदार सायकली खरेदी कराव्यात व सायकल खरेदी करिता पुरवठादार / दुकानदारांनी देलेल्या पावतीवर TIN क्रमांक असल्याशिवाय अश्या पावत्या स्वीकारू नये असे निर्देश आहेत. परंतु अशी कार्यवाही झाल्या बाबत अभिलेखे संचिकेत उपलब्ध नाही.

**3.113 जिल्हा परिषदेच्या शाळेस आवश्यक सामुग्री खरेदी मधुन दरीपंजी खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली ने सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांना दरीपंजी पुरवठा करणेसाठी रूपये 9,99,978/- खर्च केला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय व तांत्रिक मान्यता एकाच दिनांकास घेण्यात आली असुन पुरवठा आदेश दिनांक 31/03/2015 देवून त्याच दिवशी दरीपंजी नागपुरहून प्राप्त झाल्याचे गट शिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्रात नमुद आहे, परंतु महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या. नागपूर यांचेकडुन दरीपंजी पुरवठयाचे आदेश मिळविण्यासाठी दिनांक 15/04/2015 रोजी विनंती केली असुन दरीपंजी प्राप्त न होताच प्रमाणपत्र दिल्याचे दिसुन येते. तसेच तालुका स्तरावर दरीपंजी प्राप्त झालेचे साठा नोंदवही लेखापरिक्षणात उपलब्ध केली नसल्यामुळे दरीपंजी विहित कालावधीत प्राप्त झालेची खात्री करता आली नाही. तरी विलंबाने पुरवठ्याबाबत दंड वसुल करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी 1081/सीआर1940/34, दिनांक 14/06/1982 अन्वये साहित्य प्राप्त होण्यापुर्वी वरील प्रमाणे पूरवठा धारकाचे नावे धनादेश काढण्यात आला असुन सदर बाब गंभीर आहे. वरीलप्रमाणे माल पुरवठा धारकाकडून पूरवठा होण्यापुर्वी पुरवठा धारकाचे नावे धनादेश काढले जाणार नाही याची दक्षता घेणेबाबत आदेशात नमुद असताना शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) बस्कर दरीपंजी पुरवठा आदेशात नमुद केल्याप्रमाणे दरीपंजी संबंधीत गट शिक्षणाधिकारी यांचे स्तरावर पोच करुन साठा नोंदवही मध्ये नोंदलेल्या बाबतचे पृष्ठ क्रमांकाच्या पोच पावत्या कार्यालयात सादर केल्याशिवाय देयकाची अदाई करण्यात येवू नये असे असतांना देयकाची अदाई पोच पावत्यांशिवाय केलेली आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी 1083/सीआर-1074/ 57, दिनांक 29/07/1983 अन्वये शाळेकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेतलेले नाही.

**3.114 जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार खर्चातील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद हिंगोली ने सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार योजनेवर रूपये 96,400/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक संकिर्ण 1000/प्र.क्र.3241/15, मंत्रालय, मुंबई 400032, दिनांक 12/12/2000 अन्वये जिल्हा शिक्षक पुरस्कार योजना राबविण्यासाठी परिपत्राकान्वये मार्गदर्शक सुचना मधील (4) नुसार जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातुन एक प्राथमिक शिक्षक व एक माध्यमिक शिक्षकाची निवड करावयाची आहे. विशेष शिक्षक निवड करताना या मध्ये कला, क्रिडा, अपंग, संगीत इत्यादी शिक्षकाचा समावेश असावा, मार्गदर्शक सूचना (5) नुसार जिल्हा पुरस्कारसाठी निवड करताना संबंधीत शिक्षकांचा अध्यापन अनुभव, शैक्षणिक पात्रता, साहित्य लेखन, अध्यापनासाठी शिक्षकाने केलेली शैक्षणिक साधने व वैशिष्टयपूर्ण उपक्रम, शिक्षकांनी घेतलेल्या पाठाचे पाठनिरिक्षण, विद्यार्थ्याची शैक्षणिक तयारी इत्यादी निकष पडताळणे आवश्यक असुन त्यांच्या मागील पाच वर्षाच्या गोपनिय अहवालातील एकूण प्रतवारीचा निकष यांचा विचार करणे आवश्यक असताना या निकषाची कागदपत्रे संचिकेत आढळून आली नाहीत. पुरस्कारासाठी शिक्षक निवडीचे निकष केलेले आढळले नाही.

2) शिक्षक पुरस्कार मार्गदर्शक सुचना 8.7 नुसार प्रत्येक शिक्षकामागे रुपये 500/- जिल्हा पुरस्कार असावा, तसेच शिक्षकांचा सत्कार, श्रीफळ, हार व गुच्छ आणि प्रमाणपत्र देवून करावा. म्हणजे 7 शिक्षकांना रूपये 500/- प्रमाणे एकूण रूपये 3,500/- मर्यादा असताना रूपये 96,400/- खर्च केलेला असुन जादा केलेला खर्च रूपये 92,900/- वसुल केला नाही.

3) योजनेसाठी प्राप्त झालेले साहित्याच्या नोंदी साठा पुस्तकात घेतल्याबाबत तसेच सदरचे साहित्य वापराबाबतच्या नोंदीही लेखापरिक्षणात सादर केल्या नाहीत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 29(4) नुसार रूपये 1,000/- चे वरील खर्च रक्कमांचे प्रदान हे धनादेशाने करण्यात आलेले नाही.

5) उपप्रमाणक क्रमांक 21, दिनांक 02/09/2014 अन्वये जेवण व चहापाणी खर्च रूपये 41,270/- केलेला असुन आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(5) अन्वये 10 टक्के आयकराची रक्कम रूपये 4,127/- कपात केलेली नाही.

**3.115 शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत (केंद्र व राज्य हिस्सा) ग्रामीण भागातील शाळेला धान्यादी मालपुरवठा करणेवरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद हिंगोली ने सन 2014-15 चे लेखा परिक्षणात शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत रूपये 2,48,88,752/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, परिपत्रक क्रमांक शापोआ 2009/प्र.क्र.383/प्रा.शि.-4, दिनांक 26/02/2010 मधील कलम (3) नुसार गट स्तरावरुन पुरवठा आदेशानुसार तांदळाची वाहतुक व इतर धान्यांदी मालाचा पुरवठा एकाच वेळी दयावेत त्याप्रमाणे कार्यवाही केली किंवा नाही याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 03,दिनांक 30/08/2016 अन्वये मागणी करुनही पुरवठा आदेशाची संचिका लेखापरिक्षणात उपलब्ध केली नसल्यामुळे पुरवठा आदेश केंव्हा दिले आहेत हे समजू शकले नाही. लेखापरिक्षणात शालेय पोषण आहाराचे प्रमाणक व साठा नोंदवही उपलब्ध केली त्याव्यतिरिक्त कोणतेच अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाहीत. गट शिक्षणाधिकारी कार्यालयाचे तालुका स्तरावरील धान्यादी मालाची मागणी, अंतर्गत शाळेच्या मुख्याध्यापक यांची मागणी इत्यादीचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध केले नसल्यामुळे झालेला पुरवठा योग्य असल्याची खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, परिपत्रक क्रमांक शापोआ 2009/प्र.क्र.383/प्रा.शि.-4, दिनांक 26/02/2010 मधिल (ड-9) नुसार पुरवठाधारकाने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्यांचे नमुने प्रत्येकी 250 ग्राम प्रमाणे गटशिक्षणाधिकारी/अधिक्षक, शालेय पोषण आहार यांनी शासकीय प्रयोगशाळेत पाठवुन तपासणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना तपासणी अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही त्यामुळे योग्य दर्जाचा धान्यादी पुरवठा केल्याची खात्री करता आली नाही.

3) प्राथमिक शिक्षण संचालक यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधावो/प्रशिस/303/2011-12/7177(3), दिनांक 01/11/2011 नुसार महाराष्ट्र स्टेट को. ऑप कंझुमर्स फेड्रेशन लि. औरंगाबाद, यांचेकडुन धान्यादी मालाच्या देयकाची 90 टक्के रक्कम प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक आल्यानंतरच अदा करावी व जिल्हयातील शालेय पोषण आहाराच्या पुरवठा संदर्भात तक्रारी असल्यास उर्वरीत 10 टक्के रक्कम शिक्षण संचालक (प्रा.) यांच्या मान्यतेने अदा करावी असे असताना मालाच्या पुरवठयाची 100 टक्के अदाई एकाच वेळी केली आहे.

4) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2012/प्र.क्र.484/प्राशी-4 दिनांक 14/06/2013 नुसार शालेय पोषण आहार या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत 1 ली ते 5 वी प्राथमिक वर्गाच्या विद्यार्थ्यांना Other health intervention, मायक्रोन्यूट्रयंट सपलीमेंटशन, आय.एफ.ए. सिरप व इंटरनल फिडपावडर पुरवठा करणे आवश्यक असताना त्याबाबत कार्यवाही झाल्याचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

5) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2012/प्र.क्र.282/प्रशी-4, दिनांक 19/06/2013 नुसार शालेय पोषण आहार या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत इयता 6 ते 8 च्या विदयार्थाना Weekly Iron and folic supplementation योजना राबविण्यासाठी केंद्र सरकारने मार्गदर्शन सुचनामध्ये विहित केल्याप्रमाणे Iron गोळयाचा पुरवठा करण्यात यावा या प्रमाणे कार्यवाही दिसुन आली नाही.

6) देयकाची तपासणी केली असता सर्व पंचायत समितीने गट शिक्षणाधिकारी यांना तुरदाळ, हरबरा, वटाणा पुरवठा केल्याचे नोंदविले आहे, परंतु महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2010/प्र.क्र.18/प्राशी-4, मंत्रालय, मुंबई, दिनांक 02/02/2011 अन्वये परिशिष्ट अ मध्ये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत द्यावयाचा पाककृतीचा तपशिल दिला असुन त्यामध्ये दाळ तांदळाची खिचडी, मसाले भात/पुलाव इयत्ता 1 ते 5 व 6 ते 8 साठी पाककृतीत तांदुळ, मुगदाळ, तेल, हळद, मीठ, जिरे, खोबरे इत्यादी दिलेले असताना यात मुगदाळ ऐवजी तुरदाळ पुरवठा केला आहे. तसेच प्रत्येक दिवशी कोणती पाककृती केली याचे अभिलेखे उपलब्ध न झाल्यामुळे शासन आदेशाप्रमाणे अंमलबजावणी झाल्याची खात्री करता आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक 5/प्रशा/1095/2134/प्राशी-2,दिनांक 22/11/1995 नुसार इयत्ता 5 वी तील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजना लागु करण्यात आली असुन शिक्षण उपसंचालक प्राथमिक यांचे पत्र क्रमांक शालेय पोषण आहार क्रमांक 2007-08/तरतुद/प्राशी,दिनांक 31/05/2007 नुसार विदयार्थी संख्येच्या प्रमाणानुसार अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला असुन अर्धसमास पत्र क्रमांक 03, दिनांक 30/08/2016 नुसार मागणी करुनही शालेय पोषण आहाराची संचिका उपलब्ध केली नसल्याने शासन निर्णयानुसार अंमलबजावणी झाल्याची खात्री करता आली नाही.

**3.116 माहे ऑक्टोबर - नोव्हेंबर 2014 च्या 1 ली ते 5 वी व 6 वी ते 8 च्या शालेय पोषण आहार अंतर्गत धान्याधी माल पुरवठा करून सादर केलेल्या देयकातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3)** - माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर 2014 च्या 1 ली ते 5 वी व 6 वी ते 8 वी शालेय पोषण आहार अंतर्गत धान्यादि माल पुरवठा करून सादर केलेल्या देयकाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कंझूमर्स फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांचेशी करण्यात आलेल्या दिनांक 11/06/2014 च्या करारात नमूद केलेल्या अटी व शर्तीमधील बाब व अट क्रमांक 17 नुसार धान्यादि मालाचे पुरवठा आदेश मिळाल्यापासून जास्तीत जास्त 5 दिवसांमध्ये पुरवठा सुरू करावा लागेल व जास्तीत जास्त 20 दिवसांमध्ये

संपूर्ण पुरवठा करणे बंधनकारक आहे. तसेच अट क्रमांक 19 नुसार विहीत मुदतीत पुरवठा न केल्यास 0.5 टक्के प्रती आठवडयाप्रमाणे दंड आकारला जाईल.

उपरोक्त 2 आठवडे उशिराने पुरवठा केल्यामूळे 0.5 टक्के दंड रक्कम रुपये 17,200/- वसूल करावी.

**3.117 वकील फी प्रदानातील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5)** - वकील फी मानधनासाठी शिक्षण विभाग जिल्हा परिषद नांदेड यांनी रूपये 10,25,070/- जिल्हा परिषद उपकरातून खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एक वर्षासाठी कायदेविषयक सल्लागार निवड करण्यात आली. परंतु संबंधितास दिनांक 31/03/2012 पर्यंन्तचे आदेश असताना व मुदतवाढ नसताना यापुढील कालावधीचे (सन 2013 मधील) कोर्ट देयके नियमबाहय पारीत केले.

2) देय रक्कमेपक्षा अधिक प्रदान करण्यात आले.

3) निकालाची प्रत व खर्चाची उपप्रमाणके बिलासोबत संलग्न केलेले नाहीत. त्यामुळे झालेल्या खर्चाची खात्री पटत नाही.

**3.118 अनुदान निर्धारणाबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादचे सन 2014-2015 च्या लेखापरिक्षणात अनुदान निर्धारणाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादचे सन 2010-2011 पर्यंतचे अनुदान निर्धारण झाले असुन अनुदान निर्धारण अहवालाअंती रुपये 24,00,06,966/- शिक्षण विभागाकडे अखर्चित निधी शिल्लक आहे. सदरील अखर्चीत निधीपैकी मार्च 2013 मध्ये रुपये 2,73,57,880/- चलन क्रमांक 99 या चलनाद्वारे शासनखाती भरणा केलेली आहे. उर्वरित रक्कम रुपये 21,26,49,086/- एवढी अखर्चित निधी जिल्हा परिषद, शिक्षण विभागाकडे शिल्लक आहे. अखर्चीत रक्कम रुपये 21,26,49,086/- शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) ग्रामविकास विभाग, अनिनि 2013/प्र.क्र.77/वित्त-2,दिनांक 09/12/2013 नुसार अर्थिक वर्षात दिनांक 10 एप्रिल ते 15 जुलै या कालावधीत नियंत्रक अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषदांचे अुनदान निर्धारण अंतिम करावे, अनुदान निर्धारण करण्यासाठी प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील अधिकारी यांना 10 एप्रिल नंतर जिल्हा परिषदेने सर्व आवश्यक कागदपत्रे व लेखे उपलब्ध करुन देण्याची दक्षता घ्यावी. दिनांक 31 जुलैपर्यत प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील प्रशासकीय विभागाला पाठविण्यात यावा व त्याची प्रत ग्रामविकास विभागास उपलब्ध करुन देण्यात यावी. परंतु याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.119 प्राथमिक शिक्षकांची पदे अतिरीक्त असताना वस्तीशाळा निमशिक्षकांना नेमणूका देऊन शासन निधीची हानी केलेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादने सन 2014-2015 मध्ये खालील आदेशान्वये वस्तीशाळा शिक्षकांना प्राथमिक शाळांमध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

1. जि.प. उस्मानाबाद आदेश क्रमांक आ-6/996/2014 दिनांक 19/07/2014
   71 प्रशिक्षीत शिक्षक वेतनश्रेणी: 5200-20200 ग्रेड वेतन 2800
2. जि.प. उस्मानाबाद आदेश क्रमांक आ-6/997/2014 दिनांक 19/07/2014
   11 अप्रशिक्षीत शिक्षक वेतनश्रेणी: 5200-20200 ग्रेड वेतन 2000

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसएसए-2012/ प्र.क्र.250/प्रशि-4,दिनांक 01/03/2014 चे परिच्छेद 6 अन्वये वस्तीशाळा निमशिक्षकांना जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये रिक्त पदावर कायमस्वरुपी वेतनश्रेणीवर सामावून घेऊन त्यांचे समायोजन करावयाचे आहे. तथापि रिक्त पदे नसताना समायोजन केलेले आहे.

2) सदर वस्तीशाळा समायोजन संचीका तपासता टिपण्णी क्रमांक 15 मध्ये उपशिक्षणाधिकारी यांनी आर.टी.ई ॲक्ट 2009 नुसार शिक्षकांची 713 पदे अतिरीक्त आहेत असे नमूद केलेले आहे.

3) टिपण्णी क्रमांक 24 नुसार अतिरीक्त 713 शिक्षकामध्ये 126 वस्तीशाळा शिक्षकांचा समावेश असल्याचे नमूद केलेले आहे. त्यामुळे वस्तीशाळा निमशिक्षकांव्यतिरीक्त पूर्वीपासून जिल्हा परिषद सेवेत नियमीत शिक्षक पदावरील 587 शिक्षक अतिरिक्त असतानाही पदे भरण्यात आलेली आहेत.

4) टिपण्णी क्रमांक 38 व 39 नुसार सामान्य प्रशासन विभागाने पूर्वीच कार्यरत असलेल्या नियमित शिक्षकांच्या समायोजनानंतर वस्तीशाळा निमशिक्षकांना सामावून घेण्यात यावे. असे अभिप्राय नोंदवूनही वस्तीशाळा निमशिक्षकांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून सेवेत सामावून घेतलेले आहे.

5) जिल्हा परिषद, उस्मानाबाद अंतर्गत शिक्षण विभागाकडे पूर्वीचेच नियमित शिक्षक अतिरीक्त असताना वस्तीशाळा निमशिक्षकांना प्राथमिक शाळेवर नियमीत शिक्षक म्हणून नेमणूक दिल्यामुळे शासनाचे सन 2014-2015 वर्षात रुपये 1,47,71,091/- चे नुकसान झालेले आहे. याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

**3.120 प्राथमिक शिक्षकांची पदे अतिरिक्त असताना वस्तीशाळा निमशिक्षकांना नेमणूका देऊन शासन निधीची हानी केलेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, लातूर, सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात खालील आदेशान्वये वस्ती शाळा शिक्षकांना प्राथमीक शाळामध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

जिल्हा परिषद, लातूर आदेश जा.क्र.जिपला/शिक्षण(प्राथ)/कार्या-01/कावि-412,दिनांक 23/06/2014 अन्वये 69 प्रशिक्षीत शिक्षक वेतनश्रेणी 5200-20200 ग्रेड वेतन 2800 व जिल्हा परिषद, लातूर आदेश जा. क्र. जिपला/शिक्षण(प्राथ)/कार्या-01/कावि-413, दिनांक 23/06/2014, 22 अप्रशिक्षीत शिक्षक वेतनश्रेणी 5200-20200 ग्रेड वेतन 2000, मध्ये सामावून घेतले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय, क्रमांक एसएसए-2012/ प्र.क्र.250/प्रशि-4,दिनांक 01/03/2014 चे परिच्छेद 6 अन्वये वस्तीशाळा निमशिक्षकांना जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये रिक्त पदावर कायमस्वरुपी वेतनश्रेणीवर सामावून घेऊन त्यांचे समायोजन करावयाचे आहे. तथापी रिक्त पदे नसताना समायोजन केलेले आहे.

2) सदर वस्तीशाळा समायोजन संचिका तपासता टिपण्णी क्रमांक 15,दिनांक 11/06/2014 मध्ये सदयस्थितीत लातूर जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे नाहीत तसेच आर. टी. ई ॲक्ट नुसार पदनिश्चीती झाल्यासही प्राथमिक शिक्षकांची पदे अतिरीक्त होणार आहेत. असे नमूद केले आहे.

3) जिल्हा परिषद लातूर, पत्र जावक क्रमांक जिपला/शिक्षण(प्राथ)/कार्या-01/सीआर-350/कावि/ 2014,दिनांक 12/06/2014 नुसार सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ईत्यादी यांना पाठवलेल्या पत्रात संचमान्यतेचा व आजरोजी जिल्हयामध्ये कार्यरत शिक्षकांचा विचार करता प्राथमिक शिक्षकांची 648 पदे अतिरिक्त होतात असे नमूद केले आहे. त्यामुळे 91 + 648 = 739 पदे अतिरिक्त ठरतात.

4) जिल्हा परिषद, लातूर अंतर्गत शिक्षण विभागाकडे पूर्वीचेच नियमित शिक्षक अतिरीक्त असताना वस्तीशाळा निमशिक्षकांना प्राथमिक शाळेवर नियमीत शिक्षक म्हणून नेमणूक दिल्यामुळे शासनाचे सन 2014-15 वर्षात रुपये 2,55,39,292/- चे नुकसान झालेले आहे. याबाबत जबाबदारी निश्चीत होणे आवश्यक आहे. व सदर रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.